मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

उपसंपादक - श्री विलास गायकवाड • कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे • निवासी संपादक - श्री राकेश पाटील • सह संपादक - श्री मुकुंद कांबळे • महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे • कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २९६ | गुरुवार, ०९ जुलै २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514




# दि. बा. पाटील नामकरणासाठीचा मोर्चा पनवेलमध्येच रोखला; आंदोलनकर्ते ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि प्रकल्पग्रस्तांच्या वतीने बुधवारी पनवेलहून मुंबईतील विधिमंडळावर काढण्यात येणारा पायी मोर्चा पोलिसांनी पनवेलमध्येच रोखला. आंदोलनासाठी परवानगी नाकारण्यात आल्यानंतर आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. यावेळी पोलिस आणि आंदोलनकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची, घोषणाबाजी आणि किरकोळ झटापट झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मोर्चाची सुरुवात पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोरून होणार होती. तेथून विधिमंडळावर पायी मोर्चा नेण्याची तयारी आंदोलनकर्त्यांनी केली होती. मात्र, आंदोलन सुरू होताच पनवेल शहर पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत मोर्चेकऱ्यांना पुढे जाण्यापासून रोखले. काही आंदोलकांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी त्यांना हटवत ताब्यात घेतले.

या आंदोलनाचे नेतृत्व रश्मिता पोपेटा यांनी केले. यावेळी खासदार सुरेश म्हात्रे, शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील, मा.आ.मनोहर भोईर, जिल्हाप्रमुख दिपक निकम, सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, महानगरप्रमुख ॲड.समाधान काशिद,



उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, मा.जिल्हाप्रमुख शिरिष घरत, काँग्रेस जिल्हाध्यक्षा श्रुती म्हात्रे, हेमराज म्हात्रे, शहरप्रमुख प्रवीण जाधव, सदानंद शिर्के, यतीन देशमुख, यांच्यासह महाविकास आघाडीतील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सरकार दि. बा. पाटील यांच्या नावाच्या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत आंदोलकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

या आंदोलनाला महायुतीतील



भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचा पाठिंबा नव्हता. त्यामुळे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच ते दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही आंदोलनाच्या नेत्यांनी केला.

गेल्या दोन आठवड्यांपासून पनवेल आणि उरण परिसरातील प्रकल्पग्रस्त गावांमध्ये बैठका घेऊन या मोर्चाची तयारी सुरू होती. यापूर्वी सामाजिक कार्यकर्त्या रश्मिता पोपटा यांच्या उपोषणानंतर दि. बा. पाटील नामकरणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला होता. त्यानंतर विधिमंडळावर पायी मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, पोलिसांनी मोर्चा सुरू होण्यापूर्वीच कारवाई केल्याने प्रकल्पग्रस्तांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पोलिसांच्या कारवाईवर टीका करत, "रायगडमध्ये यापूर्वीही अनेक आंदोलने झाली आहेत. सर्व आंदोलनांना परवानगी मिळतेच असे नाही; मात्र यावेळी पोलिसांनी घेतलेली भूमिका दडपशाहीची असून ती लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारी आहे. दि. बा. पाटील यांच्या नावासाठीचा लढा यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहील," असे सांगितले. तर शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी सुद्धा शासनाचा व केंद्र शासनाचा निषेध केला. या आंदोलनात शिवसेना पूर्ण ताकदीनिशी उतरली असून कोणत्याही परिस्थितीत पोलिसांची दडपशाही सहन केली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पनवेल शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या. दरम्यान या मोर्चा दरम्यानच मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या रश्मिता पोपेटा यांची प्रकृती खालावल्याने त्यांनी तातडीने एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले आहे व आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेवून रोडपाली येथील मुख्यालयात एकत्रित जमा केल्याची माहिती मिळत आहे.




# पनवेल शहरात पाऊस धो धो बरसला

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल पनवेल :** बुधवारी धो धो पाऊस बरसल्याने अनेक ठिकाणी पाणी साचले. यावेळी रस्त्यावरून वाहने बाहेर काढताना नागरिकांची त्रेधा तिरपीट उडाली. बुधवारी पहाटेपासूनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. यामुळे अनेक ठिकाणच्या रस्त्यांवर पाणी साचले तर शेतांमध्ये देखील पाणी साचले. पनवेल शहरातील उरण नाका परिसरात गुडघाभर पाणी साचले होते तर शनी मंदिरसमोरच्या रस्त्यावर



देखील पाणी साचले. कृष्णाळे तलावातून पाणी ओवर फ्लो झाले तर नवीन पनवेल शहरातील आदई तलावातून देखील पाणी ओवरफ्लो झाल्याने रस्त्यावर पाणी आले होते. त्यामुळे त्या ठिकाणाहून चालताना आणि वाहन बाहेर काढताना नागरिकांची तारांबळ उडाली. मुसळधार पाऊस बरसत असल्याने ढी नदीला महापूर आला होता. या पावसाचा फटका अनेकांना बसला. अनेकांची दुचाकी वाहने रस्त्यातच बंद पडली.




# भाताण येथील १५ एकर 'आकारीपड' जमीन अमिटी विद्यापीठाला हस्तांतरित; मनसेचा तीव्र निषेध

## १५ दिवसांत लेखी स्पष्टीकरण न दिल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुकुंद कांबळे सह संपादक :** पनवेल तालुक्यातील भाताण येथील सुमारे १५ एकर 'आकारीपड' जमीन ग्रामस्थांना कोणतीही पूर्वसूचना न देता बेकायदेशीररीत्या अमिटी विद्यापीठाला हस्तांतरित करण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. या प्रकरणाचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना, पनवेल तालुक्याच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे.

या गंभीर प्रकरणासंदर्भात मनसेच्या शिष्टमंडळाने कोकण विभागीय आयुक्त कार्यालयातील तहसीलदार (महसूल), कोकण विभाग यांना जाहीर निवेदन सादर केले. प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनातून मनसेने आक्रमक भूमिका घेत या जमीन हस्तांतरण प्रकरणाची सखोल चौकशी करून स्थानिक ग्रामस्थांना न्याय देण्याची मागणी केली आहे.

या विषयावर येत्या १५ दिवसांत प्रशासनाने लेखी स्पष्टीकरण अथवा समाधानकारक उत्तर न दिल्यास हा लढा अधिक तीव्र करून वरिष्ठ पातळीवर नेण्यात येईल, असा इशारा मनसेने दिला आहे. तसेच भाताण ग्रामस्थांना न्याय मिळेपर्यंत मनसेच्या वतीने सातत्याने आंदोलने करण्यात येतील, असेही प्रशासनाला ठणकावून सांगण्यात आले.

यावेळी मनसे विभाग अध्यक्ष नितेश भोईर, भाताण शाखा अध्यक्ष विजय ठाकूर तसेच महाराष्ट्र सैनिक साईनाथ पाटील उपस्थित होते. या प्रकरणात स्थानिक भूमिपुत्रांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका मनसेने घेतली आहे.

"हा लढा कोणत्याही एका राजकीय पक्षाचा नसून संपूर्ण गावकीचा आणि भाताण गावातील येणाऱ्या पुढील पिढ्यांच्या भविष्याचा आहे. त्यामुळे या आंदोलनात आणि कायदेशीर लढ्यात भाताण गावातील सर्व ग्रामस्थांनी पक्षभेद विसरून एकत्र यावे व सहकार्य करावे," असे आवाहन मनसे पनवेल तालुका अध्यक्ष सुजित सोनावणे यांनी केले आहे.

# शाखा अभियंता विनायक परशुराम ताठरे सेवानिवृत्त

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल पंचायत समिती येथील शाखा अभियंता विनायक परशुराम ताठरे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांना गटविकास अधिकारी समीर वाठारकर, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता विनोद माहोरे, उप अभियंता (बांधकाम) राखाडे यांच्यासह अनेकांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



विनायक ताठरे यांचे मूळ गाव- वांद्री ( ता.संगमेश्वर) असून त्यांनी शिक्षण - शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी येथून सिव्हिल इंजिनिअरिंग मधील पदविका घेतली. १७ डिसेंबर १९९३ रोजी पंचायत समिती पोलादपूर येथे कनिष्ठ आरेखक पदावर रुजू झाले. १८ वर्षे ६ महिने पोलादपूर येथे सेवा केली. त्यानंतर ४ जुलै २०१२ पासून पनवेल पंचायत समिती येथे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर हजर झाले. २० सप्टेंबर २०१६ रोजी कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नतीने पंचायत समिती पेण येथे बदली झाली. ६ वर्षे ६ महिने पेण येथे कामकाज केल्यावर एप्रिल २०२२ मध्ये शाखा अभियंता म्हणून पंचायत समिती पनवेल येथे बदली झाली. विनायक ताठरे ३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

# जासई येथील हायस्कूलमध्ये मासिक पाळी जनजागृती शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी आरोग्य जनजागृती आणि मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. 'शीलक्ष्मी सोशल फाउंडेशन' आणि 'पगारिया वेल्फेअर फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. या शिबिरादरम्यान शाळेतील विद्यार्थिनींना पुनर्वापर करता येणाऱ्या सॅनिटरी पॅडचे मोफत वितरण करण्यात आले.

समाजात मासिक पाळीबाबत असलेले गैरसमज, भीती आणि टॅबू दूर करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. संस्थेचे स्वयंसेवक हृदया पाटील यांनी विद्यार्थिनींना या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. मासिक पाळी ही एक अत्यंत नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया आहे, त्यामुळे मुलींनी याबाबत कोणतीही लाज किंवा भीती बाळगू नये, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

या शिबिरामध्ये विद्यार्थिनींना आरोग्याविषयी खालील महत्त्वपूर्ण टिप्स देण्यात आल्या:

संसर्ग टाळण्यासाठी मासिक पाळी दरम्यान शरीराची योग्य स्वच्छता राखणे आवश्यक आहे.नियमित वेळेत पॅड बदलणे आणि स्वच्छ

## सॅनिटरी पॅडचे वितरण !



पाण्याचा वापर करणे गरजेचे आहे. शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी योग्य ठेवण्यासाठी आहारात पालक, हिरव्या पालेभाज्या, खजूर, गूळ, डाळी आणि बीट यांचा समावेश करावा.

या मार्गदर्शनानंतर विद्यार्थिनींनी कोणताही संकोच न बाळगता आरोग्यविषयक प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शीलक्ष्मी सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रजनी ताजणे यांनी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि सर्व सेवा सेवकांचे मनःपूर्वक आभार मानले विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि महिला सशक्ति करण्यासाठी भविष्यातही असे उपक्रम राबवणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले या उपक्रमामुळे जासई येथील विद्यार्थिनींमध्ये आरोग्यदायी जीवन शैली बाबत एक सकारात्मक पाऊल पडले आहे.

# देवकुंड, सिक्रेट पॉईंट आणि ताम्हिणी घाट परिसरात ३० सप्टेंबरपर्यंत पर्यटकांना प्रवेशबंदी !

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :-सचिन पवार रायगड** : हवामान खात्याने रायगड जिल्ह्यासाठी अतिमुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाचा 'रेड अलर्ट' (रेडअलर्ट ) जारी केला आहे. नदी-नाल्यांना येणारा पूर आणि दरडी कोसळण्याचा थेट धोका असतानाही, माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध 'देवकुंड' धबधब्यावर पर्यटकांची बेफाम हुल्लडबाजी आणि गर्दी राजरोसपणे सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षेचा विचार करून प्रशासन सरसावले आहे. माणगाव उपविभागीय अधिकारी संदीपान सानप यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत या संपूर्ण परिसरात ३० सप्टेंबरपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू करत पर्यटकांना पूर्णपणे बंदी घातली आहे.

**पूर्वीच्या दुर्दैवी घटनांमुळे प्रशासन सतर्क**

या परिसरात यापूर्वी अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला आहे. सन २०१७ मध्ये नदीच्या



प्रवाहात वाहून गेल्याने ४ पर्यटकांचा मृत्यू झाला होता, तर ५५ पर्यटक नदीपात्रात अडकले होते. त्यानंतर २०१८ मध्ये ३, तर २०२२ मध्येही एका पर्यटकाचा येथे बळी गेला होता. हाच धोका ओळखून प्रशासनाने भिरा आणि उन्नई धरणाच्या आसपास ५०० मीटरच्या परिसरात पर्यटकांना येण्यास आणि वाहने आणण्यास सक्त मनाई केली आहे.

**स्थानिक यंत्रणेची डोळेझाक आणि छुप्या पर्यटनाचा सुळसुळाट?**

## कलम १६३ अंतर्गत आदेश लागू

प्रशासनाने कागदावर बंदी आणली असली, तरी जमिनीवरील वास्तव अत्यंत धक्कादायक आहे. बंदी असलेल्या ५०० मीटर क्षेत्रात स्थानिकांनी दुकाने आणि टपऱ्या थाटल्या आहेत. पर्यटक धरणाच्या अगदी कडेला जीव मुठीत धरून फिरत आहेत. विशेष म्हणजे, देवकुंडकडे जाणाऱ्या मार्गावर पर्यटकांकडून पार्किंगच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा दराने उघडपणे आर्थिक वसुली केली जात आहे. पोलीस आणि स्थानिक प्रशासनाच्या नाकाखाली हा सर्व प्रकार सुरू असतानाही कोणतीही ठोस कारवाई केली जात नाहीये. स्थानिक पुढाऱ्यांचा दबाव आणि ३-४ महिन्यांच्या उदरनिर्वाहाचे 'आर्थिक गणित' बिघडू नये म्हणून मानवी जिवाच्या सुरक्षिततेकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात असल्याचा गंभीर आरोप आता होऊ लागला आहे.

**या गोष्टींवर असेल पूर्णपणे बंदी:**

पर्यटकांच्या हुल्लडबाजीला चाप लावण्यासाठी प्रशासनाने खालील गोष्टींवर तात्काळ बंदी घातली आहे: धबधब्यांच्या परिसरात मद्यपान करणे, मद्य बाळगणे किंवा त्याची विक्री करणे. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढणे, फोटो आणि चित्रीकरण करणे. वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरणे किंवा पोहणे. धबधब्याच्या माथ्यावर जाणे किंवा पाण्याच्या तीव्र झोताखाली बसणे. धरण, तलाव आणि धबधब्याच्या १ किलोमीटर परिसरात खासगी वाहनांना प्रवेश (अत्यावश्यक सेवा वगळून). परिसरात कचरा, प्लास्टिक व काचेच्या बाटल्या फेकणे.महिलांची छेडछाड, अश्लील वर्तन किंवा टिंगलटवाळी. मोठ्या आवाजात डीजे, स्पीकर किंवा ध्वनीप्रदूषण करणारी साधने वाजवणे. प्रशासनाने नागरिक आणि पर्यटकांना या आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

# खारघरमध्ये 15 दिवसांपूर्वी केलेला डांबरी रस्ता खचला; शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केला नित्कृष्ट कामाचा निषेध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** खारघर प्रभाग क्रमांक 6 मधील वास्तु विहार परिसरात पनवेल महानगरपालिकेमार्फत अवघ्या 15 दिवसांपूर्वी करण्यात आलेले डांबरीकरण काही ठिकाणी अचानक खचल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

वास्तु विहार हा परिसर अत्यंत वर्दळीचा असून, येथून दररोज शालेय बस, विद्यार्थी, पालक तसेच हजारो नागरिकांची ये-जा असते. परिसरात अनेक शाळा व महाविद्यालये असल्याने रस्ता खचल्यामुळे मोठ्या अपघाताचा धोका निर्माण झाला होता. ही बाब




समजताच शिवसेना खारघर उपशहर प्रमुख नंदु वारुंगसे यांनी तात्काळ प्रभाग अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यानंतर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत बॅरिकेड्स व इशारा फलक लावून परिसर सुरक्षित केला. मात्र, अवघ्या 15 दिवसांत नव्याने डांबरीकरण केलेला रस्ता खचल्याने संबंधित कामाच्या दर्जा, वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता तसेच कामाच्या देखरेख आणि गुणवत्ता नियंत्रणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

नागरिकांच्या करातून करण्यात येणाऱ्या विकासकामांचा दर्जा इतक्या कमी कालावधीत उघड होणे स्वीकारार्ह नसल्याचे मत नंदु वारुंगसे यांनी व्यक्त केले असून, या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

# खार्डी गावातील निर्मल नगरी येथे संरक्षक भिंत कोसळली

## वाहनांचे मोठे नुकसान, सुदैवाने जीवितहानी टळली

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी** :खार्डी गावा जवळील निर्मल नगरी या इमारितीची आज संरक्षक भिंत अचानक कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. भिंतीच्या बाजूला उभ्या असलेल्या अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने ही घटना घडली त्यावेळी कोणतीही व्यक्ती भिंतीजवळ नसल्याने मोठी जीवितहानी टळली.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी संबंधित प्रशासनाकडे या घटनेची तातडीने दखल घेऊन पंचनामा करण्याची, नुकसानग्रस्तांना योग्य नुकसानभरपाई देण्याची तसेच परिसरातील



धोकादायक संरक्षक भिंतींची त्वरित पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# पनवेलमध्ये सहा दिवसात एक हजार मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू झालेल्या पावसाने जुलै महिन्यात रौद्ररूप धारण केले. पनवेलमध्ये गेल्या सहा दिवसात 1000 मिलिमीटर पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

जून महिना संपत आला तरी देखील पनवेल तालुक्यात पावसाचा पत्ता नव्हता. साधारणता सात जून रोजी पावसाची सुरुवात होते. मात्र यावर्षी 23 जून रोजी पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर तीन ते चार दिवस पाऊस झाला नाही. 28 जून पासून पावसाला नियमित सुरुवात झाली आणि जुलै महिन्यात पावसाने हाहाकार माजवला. गेल्या सहा दिवसात पनवेल तालुक्यात मुसळधार पाऊस बरसला. नद्या-नाले ओसंडून वाहू लागले.

गेल्या सहा दिवसात तालुक्यात 1000 मिलिमीटर पेक्षा जास्त पावसाची नोंद झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले होते. अनेकांनी कामावर दांडी मारली. नद्यांना पूर आला होता.

**आकडेवारी**

एक जुलै - 191 मिलिमीटर
दोन जुलै -116 मिलिमीटर
3 जुलै -78 मिलीमीटर
4 जुलै- 282 मिलिमीटर
5 जुलै - 225 मिलिमीटर
6 जुलै - 74 मिलीमीटर

# निफाड नगरपंचायत अध्यक्षपदी अरुंधती विजय पवार यांची बिनविरोध निवड; विशेष सभेत अधिकृत घोषणा

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**नाशिक :** निफाड नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी अरुंधती विजय पवार यांची बुधवारी (दि. ८) बिनविरोध निवड करण्यात आली. नगराध्यक्ष. कांताबाई अशोक कर्डिले यांनी ११ जून २०२६ रोजी आपल्या पदाचा स्वेच्छेने राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केल्यानंतर रिक्त झालेल्या अध्यक्षपदासाठी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५ तसेच प्रचलित नियमांनुसार निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली.याअनुषंगाने निफाड नगरपंचायत सभागृहात बुधवारी सकाळी ११ वाजता



विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस नगरपंचायतीचे एकूण १० नगरसेवक-नगरसेविका तसेच एक स्वीकृत नगरसेवक उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेचे कामकाज पिठासीन अधिकारी तथा निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.सभेच्या प्रारंभी निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धीरज भामरे यांनी सभेच्या कामकाजाचे स्वरूप, अध्यक्षपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया तसेच संबंधित नियमांची माहिती उपस्थित सदस्यांना दिली.नगराध्यक्ष पदासाठी अरुंधती विजय पवार यांचा एकमेव नामनिर्देशन अर्ज विहित मुदतीत प्राप्त झाला होता. अर्जाची छाननी व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अन्य कोणताही वैध उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने पिठासीन अधिकारी विशाल नाईकवाडे यांनी अरुंधती विजय पवार यांची निफाड नगरपंचायत अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली. निवड जाहीर होताच सभागृहात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित नगरसेवक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नवनिर्वाचित अध्यक्षा अरुंधती विजय पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसेच त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.यावेळी नगरपंचायतीतील पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट

**दैनिक युवक आधार**

**कल्याण/रशीद शेख** : गेल्या २९ मे आणि ३० मे रोजी अल्पप्रमाणात पेरणी योग्य पाऊस झाला आणि कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील भात पेरणीला सुरुवात केली. दोन दिवसात शेतकऱ्यांनी पेरण्या पूर्ण केल्या आणि १ जुलैपासून पावसाळा सुरुवात झाली, परंतु सततच्या पडणाऱ्या मुसळधार पावसाने काही ठिकाणी पेरणी केलेले भात, बियाणे वाहून गेले तर काही ठिकाणी उगवण झालेले भात रोप पाण्यात बुडून राहिल्याने भाताची रोपे कुजून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांनी नवीन बियाणे विकत आणून गादीवाफ्यावर पेरणी केली होती ती

ही या पावसाने कुजून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्याचे फार मोठे नुकसान झाले आहे.एक तर आर्थिक नुकसान झाले आणि दुसरे रोप उपलब्ध नसल्याने भाताची पुनर्लागवड करू शकत नाही.त्याच बरोबर शेतकऱ्याला पुन्हा पेरणी



करण्यासाठी भात बियाणेही उपलब्ध नाही ,त्यामुळे कल्याण

तालुक्यातील शेतकऱ्याच्या हातून खरीप हंगामातील भात पिकाला मुकावे लागणार की काय याची भीती शेतकऱ्याच्या मनात निर्माण झाली आहे.तरी कल्याण तहसीलदार व कृषी विभागाने याकडे लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. मुरबाड विधानसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीण भागातील मुरबाड तालुका अंबरनाथ बदलापूर ग्रामीण या भागात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणामध्ये अतिवृष्टी होत

असल्यामुळे अनेक ठिकाणी नद्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे अनेक ठिकाणी रस्ते खचले आहेत अनेक ठिकाणी पुलावरून पाणी गेल्यामुळे गावांचा संपर्क तुटला आहे रस्त्यावर झाडें कोसळली आहेत कल्याण ग्रामीण मधील जुन्या रायते पुलावरून पाणी वाहत आहे कल्याण शहराकडे जाताना काबा या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गवर पाणी साचत आहे मुरबाड तालुक्यातील चासोळे घोरले या गावात पुलावरून पाणी गेले आहे तर चिखले गावात पाणी आहे रुंदे गावाच्या पुलावरून पाणी गेले शेतकरी बळीराजा ओल्या दुष्काळ जाहीर करुन कृषी विभाग महसूल प्रशासन आणि संबंधित प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकरी वर्गाला भरपाई द्यावी असे आम्ही तुमच्या निदर्शनास आणून देत आहोंत सरकार मायबाप हिचं आमची कळ कळीची विनंती समाज सेवक रशीद शेख कल्याण तालुका अध्यक्ष पोलिस मित्र आंतरराष्ट्रीय मानवाधिकार व दै युवक आधार (पत्रकार) रायते.

# भक्तिमय वातावरणात प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव :** प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज चारिटेबल ट्रस्टच्या वतीने उदयनगर चौक (श्रीराम नगर) येथे प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज यांची जयंती मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी काँग्रेसचे प्रवक्ते मा. अतुलजी लोंढे यांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच त्यांनी प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज यांच्या अलौकिक जीवनकार्य, अध्यात्म, समाजप्रबोधन आणि तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



यानंतर गुरुदेव मित्र मंडळाच्या भजन मंडळाने सादर केलेल्या सुमधुर भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. उपस्थित भाविकांनी भक्तिगीतांचा मनमुराद आनंद घेतला.

शेवटी आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे अध्यक्ष भाईजी मोहोड, , ॲड. अशोक यावले, द चिटणीसपुरा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष अजय लांबट, सुदामजी शिंगणे,विनोद राऊत, प्रदीप अहिरे, दिवाकर मोहोड, अरुण वराडे, देवराव (भाऊ) वावरे चंदनसिंग बघेल, ठाकरे साहेब, सुरेश निंबार्ते, बंडू शिरसागर तसेच इतर कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या भक्तिमय सोहळ्यास श्रीराम नगर परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराजांना अभिवादन केले.

# शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका : ना. नितीन गडकरी

## ना. विजेंदर गुप्ता,भाजपचे प्रवक्ते खा. डॉ. त्रिवेदी यांच्या हस्ते माजी आ. भीमराव धोंडे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे** : शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका, सरकार मका, बांबु पासुन इथेनॉल निर्मिती करीत आहे, अशी उत्पादने घ्यावीत. तसेच सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रोजगार निर्मितीसाठी प्रयत्नशील आहे असे प्रतिपादन केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांनी दिल्ली येथील हॉटेल हयात रिजनसी येथे झालेल्या भव्यदिव्य कार्यक्रमात केले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना नवभारत मिडीया ग्रुपच्या वतीने महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले याप्रसंगी ना. गडकरी बोलत होते. यावेळी भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया, सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. श्रीमती अनुप्रिया पटेल,केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण ( आयुष्य ) राज्यमंत्री स्वतंत्र कारभार ना. प्रतापराव जाधव, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री ना. हरदिपसिंग पुरी, दिल्ली विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता,भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा.डॉ. सुधांशू त्रिवेदी, माजी मंत्री स्मृती इराणी उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, शैक्षणिक, राजकीय, कृषी, सामाजिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नवभारत मिडीया ग्रुपच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र गौरव पुरस्कार माजी आ. भीमराव धोंडे यांना दिल्ली येथे, दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष ना. विजेंदर गुप्ता,भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा. डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, याप्रसंगी सौ. दमयंतीताई धोंडे, अभयराजे धोंडे व इतर उपस्थितीत होते. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी गेल्या ४५ वर्षात मतदारसंघाचा मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक व इतर विकास केला आहे. त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी नवभारत मिडीया ग्रुपच्या वतीने " कॉफी टेबल बुक "अंतर्गत केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री ना. नितीन




गडकरी,भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया, सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. श्रीमती अनुप्रिया पटेल,केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण ( आयुष्य ) राज्यमंत्री स्वतंत्र कारभार ना. प्रतापराव जाधव, दिल्ली विधानसभा अध्यक्ष ना. विजेंदर गुप्ता,भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा. डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या नवभारत ग्रुपच्या वतीने मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीत केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांनी सांगितले की, मी १९९५ मध्ये महाराष्ट्रात मंत्री झाल्यावर मला अगदी शेवटच्या टप्प्यात रॉकी हिलमध्ये निवासस्थान मिळाले होते. त्याठिकाणी साधा टिव्ही सुध्दा नव्हता. महाराष्ट्रात मंत्री असताना माझ्या खात्याला फक्त २३०० कोटी रुपये निधी उपलब्ध होता. तो कसा आणि कोठे वापर करायचा असा प्रश्न होता. पण आज माझ्या खात्याकडे १५ लाख करोड रुपयांचे नियोजन आहे, आजपर्यंत अनेक हायवे बनवले असुन काश्मीर ते कन्याकुमारी असे रस्ते बनवायचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील शेतकऱ्यांना एक नंबर बनण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. सरकार मका, बांबु पासुन इथेनॉल बनवत आहे. शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रोजगार निर्माण होण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. वाढते प्रदुषण कमी करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. यावेळी ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते महिलांच्या शिक्षणाचे प्रणेते महात्मा फुले यांच्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. मला जे मिळाले त्यात मी समाधानी आहे. भविष्याची मला चिंता नाही असेही त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सांगितले की, २०४७ च्या भारताच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण ( आयुष्य ) राज्यमंत्री स्वतंत्र कारभार ना. प्रतापराव जाधव यांनी सांगितले की,लवकरच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ५० बेडचे आयुष्य हॉस्पिटल होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात की, देशातील लोकांना चांगले आरोग्य द्यायचे आहे, प्रत्येक व्यक्ती निरोगी राहण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. श्रीमती अनुप्रिया पटेल यांनी सांगितले की, समाजात वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्याचा नवभारत ग्रुप सन्मान करीत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे योगदान देशाच्या विकासासाठी महत्वाचे आहे. आज प्रत्येक व्यक्तीची लाईफस्टाईल बदलत चालली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. निरोगी जीवन जगण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने संतुलित व सकस आहार घ्यावा.

सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर यांनी सांगितले की, पालकांनी मुलींना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करावे. सोशल मिडिया मुळे लहान मुले बिघडत आहेत त्यामुळे सोशल मिडियावर काही प्रमाणात निर्बंध आले पाहिजेत. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा.डॉ. सुधांशू त्रिवेदी, दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष ना. विजेंदर गुप्ता व इतरांचेही भाषणे झाली.

यावेळी नवभारतच्या पत्रकार माधवी वाडकर यांनी माजी आ. भीमराव धोंडे यांची मुलाखत घेतली. नवभारत ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर निमिश माहेश्वरी, नवभारत ग्रुप समुहाचे अध्यक्ष ए. श्रीनिवास, नवभारतचे संचालक वैभव माहेश्वरी, निवासी संपादक संजय तिवारी, सरव्यवस्थापक कल्याण पांडे, बीड जिल्हा प्रतिनिधी रवि उबाळे व इतरांनी महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्राप्त माजी आमदार भीमराव धोंडे व सौ. दमयंतीताई धोंडे, अभयराजे धोंडे यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन आनंद सिंग यांनी केले. यावेळी पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाय, प्रा. राजू पाचे, पत्रकार दिगंबर बोडखे, प्रा. जफर शेख, संभाजी वनवे, प्रा. राहुल निकाळजे व इतर उपस्थित होते. देशपातळीवर मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी आमदार भीमराव धोंडे यांचे बीड जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

---

# सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगडच्या 14 वर्षाच्या ईव्यान गुप्ताने ट्रॅप शॉटगन नेमबाजीत मिळविले ब्रान्झ पदक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : 3 जुलै ते 5 जुलै 2026 या दरम्यान झालेल्या 29 व्या एस जे Ezekiel मेमोरियल चॅम्पियनशिप महाराष्ट्र रायफल संघटना आयोजीत शॉटगन नेमबाजीत ईव्यान गुप्ता याने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत ब्रान्झ पदक मिळवले. त्याची ऑल इंडिया शॉटगन शुटींग स्पर्धेकरीता निवड झाली. त्याच्या या यशाबद्दल संघटनेचे अध्यक्ष विजय खारकर, राष्ट्रीय नेमबाज रायगड भुषण, सेक्रेटरी व प्रशिक्षक किशन खारके,




खजिनदार प्रितम पाटील, महेश फुलोरे अंबरनाथ, अजिंक्य चौधरी काटई, कोच अलंकार कोळी, समाधान घोपरकर, सुरज थळे, किरण माळी, सुनील मढवी तसेच आंतरराष्ट्रीय कोच रालस्टन कोयलो यांनी अभिनंदन केले.

ईव्यान गुप्ताचे अभिनंदन करून सर्वांनी पुढील नेमबाजी स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या तसेच संस्थेचे किशन खारके यांनी सर्व समाजातील मुलांनी ज्यांचे वय 10 वर्षे वरील मुली व मुलांनी नेमबाजी करीता ईडियन मॉडेल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, उलवा नोड येथे असणा-या सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगड यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.


---

# तरुण गेला पाण्याच्या प्रवाहात वाहून

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यातील भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात मित्रांसोबत फिरायला गेलेला तरुण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना सात जुलै रोजी घडली. या तरुणाचा विविध ठिकाणी नदीपात्रात शोध घेतला जात आहे.

सात जुलै रोजी मयूर पाटील (राहणार कळंबोली, मुळगाव धुळे) हा त्याच्या पाच ते सहा मित्रांसोबत भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात फिरण्यासाठी गेले होता. यावेळी ते पाण्यात पोहण्यासाठी उतरले. दरम्यान



मयूर पाटील याचा पाय घसरला आणि तो खाली पडला आणि तो पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. या प्रकाराची माहिती पनवेल तालुका पोलिसांना दिल्यानंतर पनवेल तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले. रात्री अंधारात त्याला शोधण्याचा प्रयत्न पोलीस आणि ग्रामस्थांनी केला मात्र तो सापडून आला नाही. आठ जुलै रोजी एनडीआरएफची टीम, अग्निशामक दल, पनवेल तालुका पोलीस आणि ग्रामस्थ शोध मोहीम राबवत आहेत. मात्र मुसळधार पाऊस कोसळत असल्याने शोध मोहिमेत अडचणी येत आहेत.

---

# बांगंगा नदीला पूरस्थिती, ओझर येथील गावाला जोडणारा पूल धोक्यात


**दैनिक युवक आधार**

**ओझर राकेश शर्मा प्रतिनिधी** : गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बांगंगा नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली असून ओझर परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्याची पातळी वाढल्यामुळे जवळच्या गावांना जोडणारा मुख्य पूल अर्धवट पाण्याखाली गेला असून वाहतूक विस्कळीत झाली आहे.

*नगर परिषद, ओझर* च्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सध्या पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला नसला तरी पाऊस असाच सुरू राहिल्यास पूल पूर्णपणे पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने पुलाच्या दोन्ही बाजूंना अडथळे लावण्यात आले असून नागरिकांना पूल ओलांडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

"पूल अर्धवट पाण्याखाली असून पाण्याचा प्रवाह तीव्र आहे. नागरिकांनी पूल टाळून पर्यायी मार्गाचा वापर करावा. पाऊस सुरू राहिल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते," असे नगर



परिषद, ओझर च्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

नदीकाठच्या सखल भागातील काही शेतांमध्येही पाणी शिरले आहे. आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. नगर परिषद कर्मचारी आणि आपत्कालीन पथके सतर्क असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

हवामान विभागाने पुढील ४८ तासांत आणखी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. नागरिकांनी नदीकाठापासून दूर राहावे, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना घरातच ठेवावे आणि नगर परिषद, ओझर यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# निफाड ते पंढरपूर सायकल वारीसाठी ४० सायकलिस्ट सज्ज; १० जुलैला श्री विठ्ठल मंदिरातून प्रस्थान

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : वारकरी परंपरेसोबत पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि सायकलिंग संस्कृतीचा संदेश देत निफाड सायकलिस्ट यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही निफाड ते पंढरपूर सायकल वारी आयोजित करण्यात आली आहे. यंदाच्या वारीत सुमारे ४० सायकलिस्ट सहभागी होणार असून ते नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या सदस्यांसोबत ही वारी पूर्ण करणार आहेत.



या सायकल वारीला शुक्रवार, दि. १० जुलै रोजी पहाटे ५ वाजता श्री विठ्ठल मंदिर, निफाड येथून भक्तिमय वातावरणात प्रारंभ होणार आहे. वारीचा पहिला मुक्काम अहिल्यानगर येथे असेल. त्यानंतर शनिवार, दि. ११ जुलै रोजी सायकलिस्ट पंढरपूर येथे पोहोचणार आहेत.

वारीनिमित्त रविवार, दि. १२ जुलै रोजी राज्यभरातील हजारो सायकलिस्ट एकत्र येऊन पंढरपुरात भव्य सायकल रिंगण सोहळ्यात सहभागी होणार आहेत. या सोहळ्यात निफाड सायकलिस्टचे सदस्यही उत्साहाने सहभाग नोंदविणार असून वारकरी परंपरेला आधुनिक आरोग्यदायी जीवनशैलीची जोड देण्याचा संदेश देणार आहेत.

या वारीची तयारी गेल्या अनेक आठवड्यांपासून सुरू होती. सहभागी सदस्यांनी नियमित सरावासाठी दर रविवारी विविध ठिकाणी लांब पल्ल्याचे सायकलिंग केले. भद्रा मारुती, चांदवड-वडबारे, पाटणा देवी, सापुतारा आदी ठिकाणी सराव फेऱ्या पूर्ण करून शारीरिक तंदुरुस्ती आणि सहनशक्ती वाढविण्यावर भर देण्यात आला.

सायकल वारी यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष पांडुरंग कडवे, उपाध्यक्ष संदीप गवळी, सचिव दिपक बोरसे तसेच संचालक दिपक घंगाळे, राजू गवळे, शेखर बागडे, पूजा मगर, मनिषा वाघ आणि आरती मोगल हे विशेष परिश्रम घेत असून सर्व नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे.

निफाड सायकलिस्टच्या या उपक्रमामुळे धार्मिक परंपरेबरोबरच पर्यावरणपूरक वाहतूक, आरोग्य जागृती आणि सायकलिंगला चालना मिळत असल्याने या उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत आहे.

---

# आपत्कालीन परिस्थितीशी दोन हात करण्यास पालिका सज्ज ;पनवेल महापालिकेचा 'आपत्ती ब्रेक' प्लॅन तयार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : यंदाच्या मान्सूनमध्ये संभाव्य पूरस्थिती आणि नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'मान्सून पूर्व तयारी 2026' अंतर्गत व्यापक नियोजन केले आहे. घनकचरा, अग्निशमन, आरोग्य आणि निवाराकेंद्र अशा चारही आघाड्यांवर पालिकेची यंत्रणा सज्ज झाली असून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

नालेसफाईच्या कामाला गती देताना 23 मार्च 2026 पासून दररोज 315 कामगारांच्या माध्यमातून मोहीम हाती घेण्यात आली होती . पालिका हद्दीतील 102 मोठे आणि 1923 छोटे मिळून एकूण 294.06 किलोमीटर लांबीच्या नाल्यांची सफाई पालिकेने केली आहे. खारघर, कळंबोली, कामोठे आणि पनवेल या चारही प्रभाग समित्यांमध्ये युद्धपातळीवर काम करून पालिकेने नालेसफाई पूर्ण केली. यंदा पावसाला उशीराच सुरुवात झाली. जुन अखेर पावसाने पनवेल मध्ये हजेरी लावल्याने पालिका एक्शन मोडवर आहे. पालिका महापौर नितीन पाटील ,आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त कैलास गावडे यांनी आपत्कालीन यंत्रणेचे नियोजन केले आहे. बचावकार्यासाठी अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज आहे. 40 प्रशिक्षित कर्मचारी 24 तास तैनात असून त्यांच्याकडे 14 अग्निशमन वाहने, 2 इंजिन बोटी, 2 साध्या बोटी आणि 16 सॉ-कटर उपलब्ध आहेत. यामध्ये 3 फायर इंजिन, 2 वॉटर टँकर, रेस्क्यू व्हॅन आणि 16 हजार लिटर क्षमतेचे 2 फायर वॉटर बाऊझर यांचा समावेश आहे. जलद संपर्कासाठी 15 वॉकी-टॉकी हँडसेट आणि 1 बेस स्टेशन कार्यरत असून आपत्ती संपर्कासाठी चे विशेष क्रमांक घेण्यात आले आहेत. याशिवाय 30 सर्च लाईट, 60 लाईफ जॅकेट, 30 लाईफ रिंग बॉय, 12 वुडकटर मशिन, 6 फ्लोटींग पंप तसेच दोर, घन, फावडे, टॉर्च यांसारखे बचाव साहित्य पुरेशा प्रमाणात साठवण्यात आले आहे. मान्सून काळात उद्भवणाऱ्या लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू सारख्या साथरोगांवर नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने 26 आरोग्य केंद्रे आणि 6 सुसज्ज ॲम्ब्युलन्स तैनात केल्या आहेत. प्रत्येक रॅपिड रिस्पॉन्स टीममध्ये डॉक्टर, स्टाफ नर्स, फार्मासिस्ट व 2 अटेंडंट असणार आहेत. यासाठी 650 प्रकारच्या आवश्यक औषधांचा पुरेसा साठा करण्यात आला असून एम.जी.एम. व सरकारी हॉस्पिटलमध्ये राखीव बेड्सची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

अतिवृष्टीमुळे सखल भागात पाणी शिरल्यास नागरिकांच्या तात्पुरत्या निवाऱ्यासाठी पालिकेने प्रभाग 'अ' मध्ये 8, 'ब' मध्ये 2, 'क' मध्ये 3 आणि 'ड' मध्ये 4 अशी एकूण 17 निवाराकेंद्रे निश्चित केली आहेत. यामध्ये शाळा, समाजमंदिरे व महापालिकेच्या इमारतींचा समावेश असून प्रत्येक केंद्रासाठी स्वतंत्र संपर्क प्रमुख व मोबाईल क्रमांक नेमण्यात आले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत पालिकेने 022-27461500 या हेल्पलाईन वर संपर्क साधण्याचे अवाहन आयुक्तांनी केले आहे.

---

# भर पावसात महापौर नितीन पाटील यांची कळंबोलीतील समस्यांची पाहणी

## लोकप्रतिनिधींनी घेतला परिस्थितीचा आढावा

**दैनिक युवक आधार**

**कळंबोली : प्रतिनिधी** : कळंबोली शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी भर पावसात शहरातील विविध भागांचा पाहणी दौरा करण्यात आला.

पनवेलचे कार्यसम्राट महापौर माननीय नितीनभाई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक तथा कळंबोली भाजप शहराध्यक्ष अमर पाटील, नगरसेविका सौ. बायजा बबन बारगजे, नगरसेवक रामदास





शेवाळे, नगरसेविका सायली तुकाराम सरक, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, शिवसेना कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक तसेच युवा नेते महेश बारगजे यांनी प्रभाग क्रमांक ८ मधील के. एल. २ आणि के. एल. ४ परिसराला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी परिसरातील जीर्ण झालेल्या इमारती, रस्त्यांची दुरवस्था, गटारांची स्थिती तसेच पावसामुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांची पाहणी करून सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांच्या समस्या जाणून घेत संबंधित प्रश्नांवर आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने परिस्थितीची माहिती घेण्यात आली.

त्यानंतर संपूर्ण कळंबोली शहरातील विविध भागांचा पाहणी दौरा करून पावसाळ्यात नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा घेण्यात आला. भर पावसात लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून केलेल्या या पाहणी दौऱ्यामुळे नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात 'एक विद्यार्थी, एक झाड' उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : वृक्षलागवड ही काळाची गरज बनली असून, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने झाड लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. या उद्देशाने 'वृक्षवल्ली टीम सिल्लोड'च्या १०,००० वृक्ष लागवडीच्या संकल्प मोहिमेअंतर्गत, येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात 'एक विद्यार्थी, एक झाड' हा पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक निशांत म्हस्के होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून वृक्षवल्ली टीमचे डॉ. शेखर दौड आणि योगेश दिवटे उपस्थित होते. या उपक्रमात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना आंबा, चिंच, जांभूळ, लिंब, पेरू, चिकू, डाळिंब, आवळा, गुलमोहर, चाफा, बकुळ, कांचन आणि पारिजातक अशा विविध रोपांचे वाटप करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला रोपटे देऊन ते विद्यालयाच्या आवारात, शेतात, गावात किंवा स्वतःच्या घरी लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.प्रमुख पाहुणे डॉ. शेखर दौड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "झाडे ही आपली जीवनदायिनी आहेत. केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज

## वृक्षवल्ली टीमचा १०,००० वृक्ष लागवडीचा संकल्प



आणि आपली जबाबदारी आहे. 'एक विद्यार्थी, एक झाड' या उपक्रमामुळे मुलांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरण रक्षणाची संस्कृती रुजण्यास मोठी मदत होईल."योगेश दिवटे यांनी १०,००० वृक्ष लागवडीच्या संकल्प मोहिमेचा आढावा घेतला. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गजानन डमाळे यांनी वृक्ष लागवडीच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांनी मुलांना पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाचे संकट आणि वृक्षारोपणाचे महत्त्व सांगून झाडे जगवण्याची सामूहिक शपथ दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश काळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक रमेश सोनवणे, लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, भिकन आगारे, सुनील तांबे, कडूबा गीते, रमेश परदेशी, अंगद काळे, गणेश चव्हाण, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, डॉ. अमोल ताटू, गजानन दौड, संगीता तायडे, संगीता काळे, नम्रता वडमारे आणि हर्षदा सानान्से यांनी परिश्रम घेतले.

# पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघाच्या 'विद्यार्थी गुण-गौरव सोहळा २०२६' उत्साहात संपन्न

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, नैतिक मूल्यांवर ॲड. धनराज वंजारी यांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नासिकेत पानसरे**

**मुंबई :** पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघ, मुंबई यांच्या वतीने आयोजित 'विद्यार्थी गुण-गौरव सोहळा २०२६' उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर, दादर येथे संपन्न झाला. या सोहळ्यात इयत्ता १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचेही वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ज्येष्ठ साहित्यिक, व्याख्याते,माजी सहायक पोलिस आयुक्त एडव्होकेट धनराज वंजारी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, "केवळ गुण मिळविणे म्हणजे यश नव्हे. समाजात आदर्श नागरिक म्हणून उभे राहण्यासाठी नैतिक मूल्ये, सत्यशोधक दृष्टी आणि वैज्ञानिक विचारसरणी अंगीकारणे गरजेचे आहे. कोणत्याही व्यक्तीच्या




सांगण्यावर विश्वास ठेवण्यापेक्षा प्रत्येक गोष्टीची पडताळणी करून सत्य स्वीकारण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी विकसित केली पाहिजे."

ते पुढे म्हणाले, "आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), जनुकशास्त्र आणि नवीन तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा, अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून दूर राहून विवेकाने निर्णय घेण्याची सवय लावावी. आपल्या अस्तित्वाला ओळखून न्याय मिळविण्यासाठी ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हीच खरी ताकद आहे."

यावेळी इयत्ता १२ वी (एच.एस.सी.) मध्ये उत्कृष्ट यश मिळविलेल्या भक्ती संजय चौधरी (९३.८३%), अस्मिता विलास परहाड (८७.२९%) आणि कादंबरी महेश गाडगे (८५.८३%) यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच इयत्ता १० वी (एस.एस.सी.) मध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या श्रवण गणेश जेजुरकर (९७.६०%), दर्शन तुकाराम शिंदे (९५.२०%) आणि साक्षी संदीप लोंढे (९४.४०%) यांचाही गौरव करण्यात आला.

याशिवाय एमबीबीएस शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात यश मिळविलेल्या डॉ. अक्षदा महेंद्र गडगे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संघाचे अध्यक्ष बाबासाहेब ठाकूर, उपाध्यक्ष रोहिदास टाव्हरे, सचिव दत्तात्रय वाळुंज, खजिनदार महेंद्र गडगे यांच्यासह पदाधिकारी, पालक, विद्यार्थी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी गुणवत्तेबरोबरच चारित्र्य, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी जपत देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

# आंदोलन असे करा की दिल्लीला बहिरेपणाचा इलाज करावा लागेल!

स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण व्हावे, ही मागणी आजची नाही. ही मागणी अनेक दशकांच्या संघर्षातून उभी राहिली आहे. असंख्य मोर्चे, धरणे, निदर्शने, उपोषणे आणि निवेदने झाली. प्रत्येक वेळी आश्वासनांचा पाऊस पडला; पण निर्णयाचा थेंबही पडला नाही. यापेक्षा मोठी जनतेची फसवणूक कोणती?

खरे तर प्रश्न एवढाच आहे की, आपण आंदोलन करतो आहोत की केवळ आंदोलनाचा कार्यक्रम उरकतो आहोत? स्थानिक पातळीवर घोषणा देऊन, निवेदन देऊन, छायाचित्रे काढून आंदोलन संपवले की सत्ताधाऱ्यांवर त्याचा काय परिणाम होणार? दिल्लीला त्याची चाहूलही लागत नाही. ज्यांच्या टेबलावर निर्णय होतो, त्यांच्या दारापर्यंत जर आवाजच पोहोचत नसेल तर




निर्णयाची अपेक्षा कशी करणार?

इतिहासात कोणताही मोठा निर्णय सहज मिळालेला नाही. सत्तेला जनतेची ताकद दिसली, जनक्षोभ उभा राहिला आणि देशभर चर्चा झाली, तेव्हाच निर्णय घ्यावे लागले. म्हणूनच आता आंदोलनाची दिशा बदलण्याची वेळ आली आहे. हा लढा केवळ नवी मुंबईचा राहू नये; तो महाराष्ट्राचा आणि देशभर चर्चिला जाणारा स्वाभिमानाचा लढा झाला पाहिजे.

आज राज्य सरकार असो, स्थानिक लोकप्रतिनिधी असोत किंवा निर्णयप्रक्रियेत सहभागी असलेले सर्वजण—जर खरोखरच दि. बा. पाटील यांच्या कार्याचा अभिमान असेल, तर तो कृतीत दिसला पाहिजे. केवळ भाषणांमध्ये गौरव आणि प्रत्यक्षात मौन, हा दुटप्पीपणा जनता किती दिवस सहन करणार?

स्वर्गीय दि. बा. पाटील यांनी भूमिपुत्र, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांच्या नावासाठी आज पुन्हा संघर्ष करावा लागत असेल, तर हा केवळ एका नावाचा प्रश्न नाही; हा स्वाभिमानाचा प्रश्न आहे. हा त्या मातीचा प्रश्न आहे, जिच्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले.

आता आंदोलनाची व्याप्ती अशी असली पाहिजे की राष्ट्रीय माध्यमांना त्याकडे दुर्लक्ष करता येऊ नये. संसदेत प्रश्न उपस्थित व्हावा. दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना या मागणीवर भूमिका स्पष्ट करावी लागावी. राज्यकर्त्यांना शांत बसणे राजकीयदृष्ट्या महाग पडेल, अशी लोकशक्ती उभी राहिली पाहिजे. लोकशाहीत जनतेचा संघटित आवाज हा सर्वात मोठा दबाव असतो—तो प्रभावीपणे उमटला तर निर्णय टाळणे कठीण होते.

लक्षात ठेवा, इतिहास कधीच शांत बसणाऱ्यांच्या बाजूने लिहिला जात नाही. इतिहास लिहिला जातो तो संघर्ष करणाऱ्यांच्या रक्तात, घामात आणि निर्धारात. त्यामुळे आता औपचारिक आंदोलने नव्हे, तर संघटित, व्यापक आणि सातत्यपूर्ण लोकआंदोलनाची गरज आहे.

आंदोलन असे करा की दिल्लीला या मागणीकडे दुर्लक्ष करणे अशक्य झाले पाहिजे. आंदोलन असे करा की देशभर चर्चा झाली पाहिजे.

आंदोलन असे करा की निर्णय घेणाऱ्यांना जनतेच्या आवाजासमोर झुकावे लागले पाहिजे. कारण हा केवळ विमानतळाच्या नावाचा प्रश्न नाही—हा स्वाभिमान, इतिहास आणि भूमिपुत्रांच्या अस्मितेचा प्रश्न आहे.

**दिपक कोळवणकर**

# स्विगीकडून पहाटे ५ वाजेपर्यंत घरपोच फूड डिलिव्हरी सुरू!

**मुंबई :** भारतातील आघाडीच्या ऑन-डिमांड सुविधा प्लॅटफॉर्म स्विगीने रात्री उशिरापर्यंत काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी 'लेट नाईट ईट्स' ही नवी सेवा सुरू केली आहे. जागतिक वेळेनुसार काम करणारे कर्मचारी, रात्रपाळीतील व्यावसायिक आणि वाढीव कामाचे तास असणाऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन ही सुविधा देशातील ३० प्रमुख शहरांतील ४ हजारांहून अधिक कार्यालयीन ठिकाणे आणि ३० हजारांपेक्षा अधिक रेस्टॉरंट्समध्ये उपलब्ध करण्यात आली आहे. या सेवेद्वारे ग्राहकांना रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत निवडक खाद्यपदार्थ, आकर्षक सवलती, जलद वितरण सेवा आणि '२ एएम क्लब'चे विशेष लाभ मिळणार आहेत. बर्गर किंग, डॉमिनोज पिझ्झा, मॅकडोनाल्ड्स, केएफसी आणि सबवेसह अनेक लोकप्रिय ब्रँड्सचे पदार्थ उपलब्ध असतील. तसेच 'डेस्कईट्स' संकल्पनेअंतर्गत रोल्स, रॅप्स, हेल्दी बाउल्स, सॅलड्स, कॉफी, चहा, मिल्कशेक्स, स्नॅक्स, डेझर्ट्स आणि पिझ्झासारखे विविध पर्यायही देण्यात आले आहेत. स्विगीच्या माहितीनुसार, कार्यालयीन परिसरातील सुमारे २५ टक्के कर्मचारी रात्री १० नंतर अन्नाची ऑर्डर देतात. भुवनेश्वर, गोवा, कोची, लखनौ, विशाखापट्टणम आणि अहमदाबादसारख्या टियर-२ शहरांमध्ये रात्रीच्या ऑर्डर्समध्ये दुहेरी अंकांची वाढ झाली आहे. तसेच कार्यालयीन परिसरांना सेवा देणाऱ्या एक तृतीयांशपेक्षा अधिक रेस्टॉरंट्स रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ऑर्डर्स स्वीकारत आहेत.

# पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांचा नागपूर जिल्ह्याचा दौरा

# ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी दिला ४-सूत्री 'रोडमॅप'

**दैनिक युवक आधार नागपूर**

**सतीश कडू संपादक विभाग**

**नागपूर :** 'राजमाता गोमाता संवाद यात्रा'च्या सांगता समारंभाचे औचित्य साधून पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी नागपूर जिल्ह्याचा नुकताच दौरा केला. दोन दिवसीय दौऱ्यात त्यांनी नागपूर विभागातील विविध महत्त्वाच्या पशुसंवर्धन संस्था, आधुनिक प्रयोगशाळा व क्षेत्रीय प्रकल्पांना भेटी देऊन तेथील पायाभूत सुविधांची पाहणी केली तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला.

आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत शेळीपालन प्रकल्प, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र (सेंट्रल हॅचरी), वर्धा जिल्ह्यातील हेटीकुंडी फार्म आणि देवळी तालुक्यातील कारंजा (घाडगे) येथील 'टीएमव्हीपीसी' केंद्राला भेट देऊन प्रगतीचा आढावा घेतला.

नागपूर येथील गोठीत रेत प्रयोगशाळा व प्रादेशिक रोग अन्वेषण प्रयोगशाळा येथे भेट देऊन आयुक्तांनी आधुनिक रोग नियंत्रण उपाययोजनांची माहिती घेतली. स्थानिक गोवंश संवर्धनासाठी मैलाचा दगड ठरत असलेल्या 'गवळाऊ गोवंश प्रकल्पाच्या' कामाची त्यांनी विशेष प्रशंसा केली. नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील 'टीव्हीसी' जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय व ऐतिहासिक गोरक्षण सभा फार्मला भेट देऊन त्यांनी जनावरांच्या आरोग्य सुविधांची पाहणी केली, तसेच मदर डेअरी प्लांट व खनिज मिश्रण निर्मिती प्रकल्पाला भेट देऊन




दूध प्रक्रिया व दर्जेदार पशुखाद्याच्या उपलब्धतेवर चर्चा केली.

**कार्यालयांचे आधुनिकीकरण व पारदर्शकतेचे कडक निर्देश**

दौऱ्यादरम्यान आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी संस्थांमधील कामकाजाच्या गतीची कसून तपासणी केली. कार्यालयीन कामकाजात आधुनिकीकरण आणणे, पशुपालक व शेतकऱ्यांच्या तक्रारींचे जलद गतीने निवारण करणे आणि शासकीय योजना तळागाळातील शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक आहे, असे स्पष्ट करत त्यांनी कामचुकारपणा करणाऱ्या यंत्रणेला कामात गती आणण्याचे कडक निर्देश दिले. तसेच राष्ट्रीय

**'राजमाता गोमाता संवाद यात्रा' सांगता समारंभाच्या औचित्याने विविध संस्थांची पाहणी**
**कार्यालयांचे आधुनिकीकरण व कामात पारदर्शकता आणण्याचे कडक निर्देश**

पशुधन अभियान प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या उद्योजकता विकास घटकांच्या लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून निधीच्या विनियोगाबाबत सकारात्मक चर्चा केली.

**ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी आयुक्तांचा 'रोडमॅप'**

'राजमाता गोमाता संवाद यात्रा'च्या सांगता समारंभात गोशाळांचे संचालक, प्रगतीशील पशुपालक व डेअरी क्षेत्रातील तज्ज्ञांना संबोधित करताना आयुक्त महोदयांनी ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ, दुग्ध उत्पादन व चारा सुरक्षा आणि प्रगत जैवतंत्रज्ञानाचा वापर व गोवंश सुधारणा या चतु:सूत्रीवर आधारीत महत्त्वाचा कृती आराखडा मांडला.

दौऱ्यादरम्यान आयुक्तांनी केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांशीच नव्हे, तर प्रत्येक संस्थेतील शास्त्रज्ञ, पशुवैद्यकीय अधिकारी, क्षेत्रीय कर्मचारी व कामगारांशी अत्यंत जिव्हाळ्याने संवाद साधला. त्यांच्या या व्यावहारिक व सकारात्मक शैलीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण झाला आहे. या दौऱ्यामुळे नागपूर विभागातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय क्षेत्रात नाविन्यपूर्णता आणि सांघिक कामाला अधिक बळ मिळणार असून, ग्रामीण भागातील पशुपालकांना याचा थेट फायदा होईल, असा विश्वास विभागीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# एसआयआर कामाकडे शिक्षकाची पाठ; महिनाभर गैरहजर राहिल्याने अखेर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : निवडणूक विभागाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेसाठी बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या शिक्षकाने सलग महिनाभर कर्तव्यावर हजर न राहिल्याने अखेर त्यांच्याविरुद्ध सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्यात मंगळवारी (दि. ७) रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. शासकीय आदेशांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करून निवडणुकीच्या महत्त्वाच्या कामात अडथळा निर्माण केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, चारनेरवाडी येथील शिक्षक सुनीलकुमार इंगळे यांची सिल्लोड विधानसभा मतदारसंघासाठी बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. एसआयआर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी त्यांना वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या.

मात्र, इंगळे यांनी प्रशासकीय आदेशांना न जुमानता कर्तव्याकडे पाठ फिरवली. सलग महिनाभर ते गैरहजर राहिल्याने निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला.

याप्रकरणी निवडणूक विभागाच्या नायब तहसीलदार रुपाली सराफ यांनी दिलेल्या तक्रारीवरून, मंगळवारी रात्री सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्यात सुनीलकुमार इंगळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्यांनी शासकीय कामकाजात विलंब घडवून आणल्याचा आणि कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सिल्लोड ग्रामीण पोलिस करत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी 'हरित अभियान' अंतर्गत एका दिवसात झालेल्या ३० लाख वृक्षलागवडीचा हिशोब घ्यावा!

## ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर बीडमधील कथित कागदोपत्री बोगस वृक्षलागवडीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर; डॉ. गणेश ढवळे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** राज्यात यंदाच्या पावसाळ्यात ३०० कोटी वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येत असताना, गेल्या वर्षी 'हरित बीड अभियान' अंतर्गत एका दिवसात ३० लाख वृक्षलागवड केल्याचा दावा करण्यात आलेल्या मोहिमेचा प्रत्यक्ष हिशोब जाहीर करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत हरित बीड अभियानांतर्गत एका दिवसात ३० लाख वृक्षलागवड केल्याचा दावा करण्यात आला होता. या मोहिमेची 'इंडियन बुक








ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद झाल्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा सत्कार करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात पालकमंत्र्यांच्या हस्ते बीड शहरातील खंडेश्वरी दीपमाळ परिसरात लावलेली अनेक झाडे अस्तित्वात नसल्याचा तसेच पालवण येथील नवीन रेल्वे स्थानक परिसरात जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने लावलेल्या वृक्षाचेही संगोपन न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्या मुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केवळ कागदोपत्री झाल्याचा संशय व्यक्त होत असून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी डॉ.ढवळे यांनी केली आहे.

राज्यात ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक पार पडली. अशा परिस्थितीत यंदाच्या मोहिमेपूर्वी गेल्या वर्षीच्या वृक्ष लागवडीचे सामाजिक लेखापरीक्षण करून प्रत्यक्ष किती झाडे जिवंत आहेत, किती निधी खर्च झाला आणि त्याचे परिणाम काय आहेत, याचा पारदर्शक हिशोब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी ही करण्यात आली आहे.

**'इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड'साठी ४२ कोटींच्या निधीचा अपव्यय; चौकशीची मागणी**

गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे दिलेल्या निवेदनात, हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत 'इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद मिळविण्यासाठी शासनाच्या नियमांकडे दुर्लक्ष करून ७ ऑगस्ट २०२५ रोजी घाईघाईने वृक्षलागवड करण्यात आल्याचा आरोप केला आहे. या प्रक्रियेमुळे सुमारे ४२ कोटी रुपयांच्या शासन निधीचा अपव्यय झाल्याचा दावा करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**बीड जिल्ह्यासाठी यंदा ३१ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार बीड जिल्ह्यात विविध विभागांना मिळून ३१ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाला १४ लाख, वन विभागाला ६.५० लाख, वन्यजीव विभागाला १.०८ लाख, महसूल विभागाला ५० हजार, ग्रामविकास विभागाला २.४१ लाख, नगरपरिषद व नगरपंचायत विभागाला ५० हजार, जिल्हा परिषद शिक्षण विभागाला १ लाख आणि कृषी विभागाला ५ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

**लागवडीसोबत संगोपनालाही प्राधान्य द्या**

दि. ७ जुलै रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी, वन परिक्षेत्र अधिकारी एस. डी. मुंडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे व वन उपसंरक्षक उमेश बिराजदार उपस्थित होते. बैठकीत पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभाग वाढविणे, उद्दिष्टानुसार वृक्षलागवड करणे तसेच प्रत्येक लावलेल्या वृक्षाचे संगोपन व जिवंत राहण्याचे प्रमाण सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

# महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघातर्फे वित्त नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपूर -** रविवार दि ०५ जुलै २०२६ रोजी नागपूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष मा.प्रेमराज कुबडे सर तसेच महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघाचे केंद्रीय कार्यवाह नंदू बनसोड यांचे नेतृत्वात वित्त- नियोजन राज्यमंत्री मा.ना.ऍड.श्री आशिष जयस्वाल, यांना रामटेक येथील निवासस्थानी शिष्टमंडळ भेटले. कर्मचारी संघटनेचे नेते नंदू बनसोड यांनी कर्मचारी संघटनेच्या वतीने निवेदन दिले, ग्रंथालय कर्मचारी यांना अत्यल्प वेतन असल्याने फारच हालकीचे जीवन जगत आहे.असे चर्चे दरम्यान कर्मचारी संघटनेच्या महिला नेत्या तथा महिला ग्रंथालय कर्मचारी दर्शना मस्के, योगिताताई घंग्रेकर,माधुरीताई टेंभेकर,दुर्गाताई लोंढे, सुरेखाताई बोरकर, निर्मलाताई कुहीटे सौं शारदाताई गजभिये, मनीषा महाजन यांनी मंत्री महोदयांसमोर कर्मचारी अत्यल्प वेतनात कसे काम करीत, कुटुंबाची वाताहात कशी होत आहे. संपूर्ण चित्रण उभे केले, त्याच



प्रमाणे उपस्थित असलेले ग्रंथालय कार्यकर्ते सागर लोंढे, कैलास समरीत, जागेश्वर गजभिये, नरेंद्र सहारे, पंढरी कडू, प्रबोधनकार भीमशाहीर तथा पत्रकार प्रदीप कडबे,सुनील बादुले, संघपाल डोंगरे,प्रेमचंद कुसुंबे, श्याम बारई, कार्तिक गायकवाड इत्यादिनी ग्रंथालय चालवीण्यास फारच आर्थिक अडचण भासत आहे. असें आवर्जून सांगितले, कर्मचारी नेते नंदू बनसोड व नागपूर जि. ग्रंथा. संघाचे अध्यक्ष प्रेमराज कुबडे यांनी ग्रंथालय कर्मचारी यांना वेतनश्रेणी लागू करावी त्याच प्रमाणे ग्रंथालयाचे अनुदान तिप्पट वाढ केल्यास ग्रंथालय कर्मचारी यांचा वेतनाचा प्रश्न सहज सुटू शकेल. असें सांगितले, यावर मंत्री महोदयांनी भावानिक परिस्थिती लक्षात घेऊन सांगितले की मी संबंधित सचिव यांचेशी चर्चा करून त्यांनी प्रश्नाची सोडवणूक करतो, आपल्या संघटनेच्या मागण्याचा प्रश्न सोडवितो असें आश्वित केले.या प्रसंगी रामटेक, मौदा, पारशिवनी तालुका मधील कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यावर शासनाकडून कारवाई

## काँग्रेसचे संभाजी माळवदे यांच्या पाठपुराव्यास यश

**दैनिक युवक आधार**

**नेवासा प्रतिनिधी:- लखन वाल्हेकर :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात राज्य सरकारने कठोर भूमिका घेत चार अभियंत्यांचे निलंबन करत घरचा रस्ता दाखवत मोठी कारवाई केली. यात दोन कार्यकारी अभियंता व दोन उपाभियंत्यांचा समावेश आहे. राज्यभरात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या हजारो कोटींच्या कामात प्रशासन व ठेकेदार यांनी मिळून केलेला भ्रष्टाचार, कामे पूर्ण करण्यास झालेला विलंब,निकृष्ट दर्जाची कामे. कामातील अनियमितता या सर्व बाबींची समितीने केलेली चौकशी व सतत्यता समोर आल्याने हीं कारवाई करण्यात आल्याचे समजते.



मजीप्रा मधील घोटाळ्याचा काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी तब्बल तीन वर्ष पाठपुरावा केला. याविरोधात अनेकदा आंदोलने केली. मजीप्राच्या नेवासा कार्यालयासमोर, अहिल्यानगर कार्यालयासमोर धरणे आंदोलने, टाळे ठोकण्याचे आंदोलने केली.राज्य सरकारकडे याबाबत चौकशीसाठी तक्रारी केल्या. शेवटी याविरोधात औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. माळवदे यांनी याबाबत पावसाळी अधिवेशनात नेवासा विधानसभेचे आमदार विठ्ठलराव लंघे यांना प्रश्न देखील उपस्थित करण्यासाठी निवेदन दिले. या सर्व पाठपुराव्यामुळे सरकारने समिती स्थापना करून चौकशी करत अहिल्यानगर मजीप्रा मधील

चार अभियंत्याना निलंबित करत मोठी कारवाई केली.निलंबित केलेल्या या अधिकाऱ्यामध्ये एस.एस. दहिफळे ( उपअभियंता नेवासा ),एम.पी.धगधगे (तत्कालीन उपाभियंता नेवासा ) जी.एस. भोगावडे (कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर )एस. आर.वारे ( तत्कालीन कार्यकारी,अभियंता अहिल्यानगर ) यांचा समावेश आहे.अजूनही मोठे अधिकारी यात समावेश असल्याची बातमी समोर येत आहे समिती करत असलेल्या चौकशीतून जी सत्यता समोर येईल त्यावरून घोटाळयाची व्याप्ती व घोटाळे बहाद्दरांचे चेहरे समोर येईल. व शासन काय कारवाई करणार हेही जनतेला काही दिवसात दिसून येईल.

**'आझाद मैदानावर आंदोलन करणार'**
या भ्रष्टाचाराची व्याप्ती अहिल्यानगर जिल्ह्यापूर्ती मर्यादित नसून पूर्ण राज्यभर आहे. हजारो कोटींचा घोटाळा असून पूर्ण राज्यातील घोटाळे बहाद्दरावर कारवाई जोपर्यंत होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही. याविरोधात लवकरच मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करणार - संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.

# लग्नानंतर पैशांसाठी छळ, मारहाण अन् घराबाहेर हाकलल्याचा आरोप; पती, सासू, नणंद व नंदईविरुद्ध गुन्हा

## माहेरहून वारंवार पैसे आणण्याची मागणी, उपचार न केल्याचाही आरोप; समेटाचे प्रयत्न फोल ठरल्यानंतर लासलगाव पोलिसांत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** लग्नानंतर मानसिक व शारीरिक छळ करून माहेरहून वारंवार पैसे आणण्याची मागणी करत मारहाण केल्याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात पती, सासू, नणंद आणि नंदईविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समेटाचे अनेक प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर पीडित विवाहितेने महिला दक्षता विभागात तक्रार केली होती. त्यानंतर अखेर संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रेरणा आशुतोष सोनवणे (वय २४, सध्या रा. गुंजाळवाडी, ता. निफाड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांचा विवाह १४ मे २०२५ रोजी सुरेगाव (वेळापूर), ता. कोपरगाव येथील आशुतोष ज्ञानेश्वर सोनवणे यांच्याशी हिंदू रीतीरिवाजानुसार मोठ्या थाटामाटात झाला होता. विवाहासाठी माहेरच्या नातेवाईकांनी सुमारे २० लाख रुपये खर्च करून संसारोपयोगी साहित्य, फर्निचर तसेच पतीला तीन तोळयांची सोन्याची साखळी व अंगठी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादीनुसार, लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस चांगले गेले. मात्र त्यानंतर पती व सासूकडून "काम येत नाही, स्वयंपाक करता येत नाही" अशा कारणांवरून वारंवार मानसिक त्रास दिला जाऊ लागला. पती संभाजीनगर येथील सरकारी रुग्णालयात नोकरीला असल्याने ते घरी क्वचितच येत असत. घरी आल्यानंतरही पत्नीशी संवाद टाळणे, वैवाहिक जबाबदाऱ्या न पार पाडणे आणि किरकोळ कारणांवरून वाद घालणे, असे प्रकार घडत असल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

फिर्यादीनुसार, सासू निर्मला सोनवणे यांनी पतीच्या कर्जफेडीसाठी माहेरहून पैसे आणण्याचा सतत तगादा लावला. त्यानुसार माहेरकडून प्रथम ५० हजार रुपये आणि त्यानंतर एक लाख रुपये देण्यात आले. मात्र ही रक्कम परत करण्यात आली नसल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तसेच लग्नातील सोन्याचे दागिने वापरण्यास न देता ते बँकेच्या लॉकरमध्ये ठेवण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

पुढे पतीसोबत संभाजीनगर येथे वास्तव्यास गेल्यानंतरही छळ सुरूच राहिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पती उशिरा घरी येत असून कारण विचारल्यास मारहाण करून धमकावत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. किडनी स्टोनचा त्रास होत असतानाही उपचारासाठी रुग्णालयात न नेता एकटे सोडून दिल्याचा गंभीर आरोपही फिर्यादीने केला आहे.

दरम्यान, नातेवाईक व मध्यस्थांच्या उपस्थितीत अनेकदा समेटाचे प्रयत्न करण्यात आले. मात्र त्यातून कोणताही तोडगा न निघाल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. उलट नणंद तेजश्री लासुरे व नंदई भागचंद लासुरे यांनीही पतीची बाजू घेत शिवीगाळ व दमदाटी केल्याचा आरोप आहे.

फिर्यादीनुसार, डिसेंबर २०२५ मध्ये सासरी झालेल्या बैठकीत पतीने "ती मला आवडत नाही. ५० हजार रुपये आणल्याशिवाय तिला नांदवणार नाही," असे सर्वांसमोर सांगितले. फिर्यादीने पैसे आणण्यास नकार दिल्यानंतर पती, सासू, नणंद व नंदई यांनी शिवीगाळ करून मारहाण केली आणि "पैसे घेऊन ये, तरच घरात ये," असे म्हणत घराबाहेर काढल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर पीडिता माहेरी परतली.

याप्रकरणी पीडितेने ९ मार्च २०२६ रोजी महिला दक्षता विभाग, नाशिक येथे तक्रार दाखल केली होती. तेथेही समेटाचे प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर अखेर लासलगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली.

या प्रकरणी आशुतोष ज्ञानेश्वर सोनवणे, निर्मला ज्ञानेश्वर सोनवणे (रा. सुरेगाव, ता. कोपरगाव), तेजश्री भागचंद लासुरे व भागचंद परशराम लासुरे (रा. पारेगाव रोड, ता. येवला) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम ८५, ११५(२), ३५२, ३५२(२), ३५२(३) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार ज्ञानेश्वर दिनकर जाधव करीत आहेत.

# सिल्लोड: अधिकारी सुनील हुसे, सुभाष साबळे यांना निरोप

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड येथील विभागीय ग्रंथालयातील सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांची प्रशासकीय बदली 'जिल्हा ग्रंथालय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर' या पदावर झाली आहे. तसेच, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांची परभणी येथे बदली झाली आहे. या निमित्ताने मंगळवारी सिल्लोड येथील विभागीय ग्रंथालय कार्यालयात आयोजित निरोप समारंभात दोन्ही अधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार करून त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

याप्रसंगी माजी सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. बालेकर आणि डॉ. सचिन साबळे यांच्या हस्ते सुनील हुसे व सुभाष साबळे यांचा शाल व पुष्पगुच्छ



देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी आपल्या मनोगतातून दोन्ही अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कार्याचा गौरव केला आणि त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यालयीन अधीक्षक अनिल बाविस्कर, जिल्हा ग्रंथालय निरीक्षक दीपक काळे, ज्ञानेश्वर पैठणे, खेडकर यांच्यासह विभागीय ग्रंथालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकारितेसाठी पदवी व परवाना अनिवार्य करावा – पत्रकार कान्हा खानसोळे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेची विश्वासार्हता आणि गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी पत्रकारितेचे शिक्षण आणि व्यावसायिक पात्रता आवश्यक आहे. त्यामुळे पत्रकार म्हणून कार्य करण्यासाठी मान्यताप्राप्त पत्रकारिता पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अनिवार्य करण्यात यावी.

यासोबतच, वकिलांसाठी जसा व्यावसायिक परवाना आवश्यक असतो, त्याच धर्तीवर पत्रकारांसाठीही स्वतंत्र परवाना (लायसन्स) व्यवस्था लागू करण्यात यावी. आवश्यक शैक्षणिक पात्रता, आचारसंहिता आणि प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच पत्रकारिता करण्यास परवानगी मिळावी.

यामुळे समाजापर्यंत सत्य, अचूक आणि तथ्याधारित बातम्या पोहोचतील, खोटी माहिती आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्यांवर आळा बसेल, तसेच पत्रकारितेची गुणवत्ता, विश्वासार्हता आणि व्यावसायिकता अधिक बळकट होईल.

ही व्यवस्था करताना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य अबाधित राहील, याचीही सरकारने काळजी घ्यावी.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात उत्साहात 'वन महोत्सव' संपन्न



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव येथे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे,असे प्रतिपादन संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी केले.संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने १ जुलै ७ ते २०२६ जुलै दरम्यान महाविद्यालयाच्या परिसरात 'वन महोत्सव'मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ.शिरीष पवार व उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंबा,वड, पिंपळ,कडुलिंब यासारख्या छायादार विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.'झाडे लावा,झाडे जगवा' हा संदेश देत विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.सर्व उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी लावलेली झाडे जगवण्याची आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याची सामूहिक शपथ घेतली.यावेळी बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील चौधरे म्हणाले की,"केवळ झाडे लावणे पुरेसे नाही,तर त्यांचे संगोपन करणे ही आपली जबाबदारी आहे. महाविद्यालयाने यावर्षी दत्तक वृक्ष योजना सुरू केली असून, प्रत्येक विद्यार्थी एका झाडाची निगा राखणार आहे."या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.दीपक पारधे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.शिवाजी शिरसाट यांनी केले.

# मानधन न मिळाल्याने घरकुल कर्मचाऱ्यांचे धाराशिवमध्ये धरणे आंदोलन

## जुलैपर्यंत तोडगा न निघाल्यास 'लेखणी बंद'चा इशारा

**मोहम्मद पिंजारी/ धाराशिव प्रतिनिधी** : दि.०७ धाराशिव जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील पंचायत समिती घरकुल विभागातील कर्मचारी डाटा एन्ट्री ऑपरेटर आणि जिल्हा प्रोग्रामर यांचे गेल्या चार महिन्यांचे मार्च २०२६ ते जून २०२६ मानधन अद्याप जमा न झाल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी आज मंगळवार दिनांक ७ जुलै २०२६ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) धाराशिव येथे तीव्र धरणे आंदोलन केले या आंदोलनादरम्यान सीएससी (CSC) कंपनीचे प्रतिनिधी श्री आव्हाड यांनी आंदोलकांशी चर्चा केली त्यांनी येत्या शुक्रवार दिनांक १० जुलै २०२६ पर्यंत मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांचे मानधन खात्यावर जमा केले जाईल असे आश्वासन दिले आहे

**१३ जुलैपासून 'लेखणी बंद' आंदोलनाचा इशारा**

प्रशासनाने आणि संबंधित कंपनीने



दिलेल्या आश्वासनानुसार जर १० जुलै २०२६ पर्यंत मानधन जमा झाले नाही तर सोमवार दिनांक १३ जुलै २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व घरकुल कर्मचारी 'लेखणी बंद आंदोलन' करणार आहेत या संदर्भातील सविस्तर निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) जिल्हा परिषद धाराशिव तथा अध्यक्ष कार्यकारी समिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना देण्यात आले आहे

"गेल्या चार महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे जर १० जुलैपर्यंत आमच्या खात्यात मानधन जमा झाले नाही तर १३ जुलैपासून काम पूर्णपणे बंद करण्यात येईल अशी माहिती धाराशिव पंचायत समितीचे कर्मचारी व डाटा एन्ट्री ऑपरेटर इम्रानखान पटेल यांनी दिली

**आंदोलनात यांची होती उपस्थिती**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या आवारात झालेल्या या धरणे आंदोलनात जिल्ह्यातील बहुसंख्य कर्मचारी सहभागी झाले होते यामध्ये प्रामुख्याने:

श्री मेघराज पवार जिल्हा प्रोग्रामर व जिल्हा ऑपरेटर व तालुका ऑपरेटर

महेश मगर सुरज मुळे अभिमन्यू हवालदार गुरुराज पांचाळ मंगेश गावस्कर प्रदीप शेटे पंकज सूर्यवंशी स्वराज्य पाटील मयूर गुळमिरे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे घरकुल डेटा एन्ट्री ऑपरेटर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऐन पावसाळ्याच्या आणि सणासुदीच्या दिवसांत कर्मचाऱ्यांचे मानधन रखडल्याने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# यासेर उर्दू प्राथमिक शाळेत सुंदर हस्ताक्षर स्पर्धेच्या पारितोषिकांचे वितरण उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : गौरव सेवाभावी संस्था संचलित यासेर उर्दू प्राथमिक शाळेत बुधवार, दि. ८ जुलै २०२६ रोजी शालेय परिपाठादरम्यान सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला.इयत्ता पाचवी, सहावी व सातवी (सेमी व नॉन-सेमी) वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत उत्कृष्ट हस्ताक्षर करणाऱ्या एकूण सहा विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व



पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक जावेद खान, फिरोज खान पठाण, सय्यद खिजर, नजमा पठाण खान व तहमीना यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. स्पर्धेत अरबा मुजाहिद खान बागवान, अशमीरा खलील, अक्सा मीनाजोद्दीन, नवीरा मतीन खान यांच्यासह अन्य दोन विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत पारितोषिके मिळविली. स्पर्धेच्या संयोजनाची जबाबदारी माव्या मॅडम यांनी यशस्वीपणे पार पाडली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमात पर्यवेक्षक म्हणून सय्यद अमन, सय्यद इम्रान व सय्यद अझीम यांनी जबाबदारी सांभाळली. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीमा खान, शेख साजिद, शोएब अन्सारी, झीशन सय्यद, नफिसा बाजी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# हरितवारी: सिल्लोडच्या पहिल्या दिंडीच्या निमित्ताने श्री संत माऊली संस्थानात 'सुवर्णपिंपळा'चे रोपण

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड शहरातून पहिल्यांदाच निघालेल्या दिंडीच्या ऐतिहासिक निमित्ताने, वारकरी संप्रदायात अनन्यसाधारण आध्यात्मिक महत्त्व असलेल्या 'सुवर्णपिंपळा'चे रोपण श्री. संत माऊली संस्थानात करण्यात आले. डॉ. संतोष पाटील यांच्या 'हरितवारी' उपक्रमांतर्गत हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आला.

आळंदी येथे सुमारे २२०० वर्षे वयाचा पुरातन सुवर्णपिंपळ वृक्ष असून, तो साक्षात धनाची देवता कुबेराने लावला आहे, अशी मोठी धारणा आहे. माऊलींच्या मातोश्री रुक्मिणी देवी यांनी या वृक्षाला सव्वा लक्ष प्रदक्षिणा घातल्या असून, याच सुवर्णपिंपळाच्या सानिध्यात माऊलींनी



ज्ञानसाधना केली आहे. या वृक्षाचे आध्यात्मिक मूल्यासोबतच मोठे पर्यावरण मूल्यही आहे.सिल्लोड शहरातून निघालेल्या या पहिल्या दिंडीच्या औचित्यावर, संस्थानचे पीठाधीश ह.भ.प. मनोज महाराज भाग्यवंत, पत्रकार रवींद्र सोनवणे, डॉ. संतोष पाटील आणि कृष्णा शिरसाठ यांच्या शुभहस्ते या दुर्मिळ सुवर्णपिंपळाच्या वृक्षाचे रोपण करण्यात आले. या वृक्षारोपणामुळे सिल्लोडच्या मातीत आता आळंदीच्या आध्यात्मिक वारशाचा एक महत्त्वाचा दुवा रुजला आहे.

# प्रा.अंजली कदम –नारायणे महर्षी कर्वे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार २०२६ ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे /प्रतिनिधी )** : एसएनडीटी कला वाणिज्य महिला महाविद्यालय, पुणे येथील उपप्राचार्या प्रा.डॉ. अंजली रामचंद्र कदम-नारायणे यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'महर्षी कर्वे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार – २०२६' ने सन्मानित करण्यात आले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या १११व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य सोहळ्यात विद्यापीठाचे संस्थापक महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. याच ऐतिहासिक प्रसंगी शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ काळ केलेल्या समर्पित कार्यासाठी, अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थिनींना सोप्या आणि प्रभावी भाषेत अध्यापन केल्याबद्दल, शैक्षणिक क्षेत्र समृद्ध करणाऱ्या



संशोधनासाठी तसेच विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी घेतलेल्या विशेष परिश्रमाबद्दल महाविद्यालयाच्या उपप्राचार्या आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अंजली कदम-नारायणे यांना या सर्वोच्च सन्मानाने गौरविण्यात आले.

महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला चक्रदेव, केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. श्री. चंद्रकांत चंद्रदादा पाटील, राज्यसभा संसद सदस्य सौ. मेघाताई कुलकर्णी आणि माननीय राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांची मान्यवर म्हणून उपस्थिती होती.

डॉ. अंजली कदम-नारायणे यांच्या या दैदिप्यमान यशामुळे एसएनडीटी कला वाणिज्य महिला महाविद्यालय, पुणे आणि संपूर्ण एसएनडीटी विद्यापीठ परिवाराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

त्यांच्या या गौरवाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# १० वर्षे एकाच टेबलवर कार्यरत वरिष्ठ लिपिकाच्या बदलीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी योगेश चौदंते :** सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड येथील वरिष्ठ लिपिक सुनील मोरे हे गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ एकाच टेबलवर कार्यरत असल्याचा दावा करत, त्यांच्या बदलीसह कार्यकाळातील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी युवासेनेने केली आहे. यासंदर्भात मुख्य अभियंत्यांना निवेदन देण्यात आले असून, १५ जुलै २०२६ पर्यंत ठोस कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी दिला आहे.

युवासेनेने दिलेल्या निवेदनानुसार, सुनील मोरे हे दीर्घकाळ एकाच महत्त्वाच्या टेबलवर कार्यरत असून, त्यांच्या अखत्यारीत इतर चार वरिष्ठ लिपिकही काम करत आहेत. या काळात नियमबाह्य प्रशासकीय कामे झाल्याचा तसेच काही वादग्रस्त कर्मचारी व अधिकाऱ्यांना आर्थिक फायद्याच्या मोबदल्यात संरक्षण दिल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे विभागातील प्रशासनिक पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात सुनील मोरे यांची तात्काळ बदली करून त्यांच्या संपूर्ण कार्यकाळातील प्रशासकीय निर्णय, फायली आणि आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत राहिल्यामुळे निर्माण झालेल्या कथित साटेलोटे आणि भ्रष्टाचाराच्या साखळीचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने १५ जुलैपर्यंत योग्य ती कारवाई न केल्यास सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युवासेनेने दिला आहे. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या निवेदनाच्या प्रती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. या मागण्यांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागात चर्चेला उधाण आले असून, प्रशासन याबाबत काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# पत्रकार हनुमान रामावत यांचे अकाली निधन; शहरात शोककळा

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** : दिग्रस येथील सेवाभावी, मनमिळाऊ आणि ज्येष्ठ पत्रकार हनुमान रामावत यांचे बुधवारी ८ जुलै सकाळी सुमारे ८ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच शहरात शोककळा पसरली.हनुमान रामावत हे भारतीय जनता पार्टी सरचिटणीस प्रेस क्लबचे उपाध्यक्ष तसेच जागृत पत्रकार म्हणून परिचित होते. शहरातील विविध सामाजिक, सार्वजनिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग होता. अनेकांच्या सुख-दुःखात ते नेहमी सहभागी होत असल्याने त्यांचा मोठा मित्रपरिवार होता.काही



दिवसांपूर्वी त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने अमरावती येथील संत श्री अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलमध्ये अँजिओप्लास्टी करण्यात आली होती. उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले होते. मात्र बुधवारी सकाळी अचानक प्रकृती खालावल्याने उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा मोठा परिवार आहे.त्यांच्यावर गुरुवार, ९ जुलै रोजी सकाळी १० वाजता दिग्रस येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती रामावत परिवाराने दिली आहे.

# इसरो, बेंगळुरू शैक्षणिक भेटीसाठी श्री छत्रपती मुलींच्या हायस्कूलच्या दोन विद्यार्थिनींची निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील श्री छत्रपती मुलींचे हायस्कूल,भवानीनगर येथील इयत्ता दहावीच्या कु. शिवांजली भोईटे व कु.दिव्या कोळेकर या दोन गुणवंत विद्यार्थिनींची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इसरो) बेंगळुरू येथे आयोजित शैक्षणिक भेटीसाठी निवड झाली आहे.या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून,परिसरातून विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




इसरोसारख्या देशातील सर्वोच्च अंतराळ संशोधन संस्थेला प्रत्यक्ष भेट देण्याची संधी मिळणे ही विद्यार्थिनींसाठी मोठी उपलब्धी मानली जात आहे.या शैक्षणिक भेटीद्वारे त्यांना अंतराळ विज्ञान,उपग्रह तंत्रज्ञान,संशोधन प्रक्रिया आणि वैज्ञानिक नवकल्पनांची प्रत्यक्ष माहिती मिळणार असून,त्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडणार आहे.या यशाबद्दल श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.पृथ्वीराज (बापू) जाचक,सचिव शब्बीर इनामदार संस्थेचे संचालक मंडळ,शाळेच्या मुख्याध्यापिका गोरे मॅडम,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कु.शिवांजली भोईटे व कु.दिव्या कोळेकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देत भविष्यातही अशाच उल्लेखनीय यशाची कामगिरी करण्याचा विश्वास व्यक्त केला.

विद्यार्थिनींच्या या यशामुळे श्री छत्रपती मुलींच्या हायस्कूलच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एका मानाच्या यशाची नोंद झाली असून इतर विद्यार्थिनींसाठीही हा प्रेरणादायी आदर्श ठरणार आहे.

# जांभरूण नावजीत मोकाट डुकरांचा हैदोस; प्रशासनाला सात दिवसांचा अल्टिमेटम!

## कारवाई झाली नाही तर तीव्र जनआंदोलन छेडणार; क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : जांभरूण नावजी (ता. जि. वाशिम) गावात मोकाट फिरणाऱ्या पाळीव डुकरांमुळे नागरिकांचे आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षितता धोक्यात आली असून या गंभीर प्रश्नावर तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र लोकशाही आंदोलन उभारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेने प्रशासनाला दिला आहे. या संदर्भात संघटनेच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सोनू प्रविण मुळे यांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती, तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस प्रशासन तसेच इतर संबंधित विभागांना सविस्तर निवेदन सादर करून सात दिवसांत ठोस कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, गावातील काही व्यक्तींनी त्यांच्या पाळीव डुकरांना पूर्णपणे मोकाट सोडल्यामुळे ही डुकरे गावातील सार्वजनिक रस्ते, नाले, शाळा परिसर, अंगणवाडी, सार्वजनिक ठिकाणे तसेच नागरिकांच्या घरासमोर मोठ्या प्रमाणात वावरत आहेत. परिणामी गावभर दुर्गंधी पसरली असून अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या परिस्थितीमुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याबरोबरच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही विपरीत परिणाम होत असल्याचा




आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शाळकरी विद्यार्थ्यांना या मोकाट डुकरांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा ही डुकरे रस्त्यांवर अचानक आल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली असून सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. गावातील नागरिकांनी अनेकदा हा प्रश्न उपस्थित करूनही अद्याप प्रभावी कारवाई झालेली नसल्याचा दावा संघटनेने केला आहे.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेने आपल्या निवेदनात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, भारतीय न्याय संहिता (BNS), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS), भारतीय संविधानातील अनुच्छेद 21 तसेच सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भातील लागू नियमांचा उल्लेख करून संबंधित यंत्रणांनी आपल्या कायदेशीर जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, अशी मागणी केली आहे.

संघटनेने प्रशासनाकडे गावातील सर्व मोकाट डुकरांचा तात्काळ बंदोबस्त करणे, संबंधित डुकरांच्या मालकांची ओळख पटवून त्यांच्यावर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करणे, सार्वजनिक ठिकाणी डुकरे मोकाट सोडण्यास कायमस्वरूपी प्रतिबंध घालणे तसेच गावात विशेष स्वच्छता व निर्जंतुकीकरण मोहीम राबविणे अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

यासंदर्भात संबंधित प्रशासनाला सात दिवसांचा अंतिम अवधी देण्यात आला असून, या कालावधीत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल करून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. त्यामुळे आता प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे कितपत गांभीर्याने पाहते आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

मोकाट डुकरांमुळे निर्माण झालेली अस्वच्छता ही केवळ त्रासदायक बाब नसून सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे केवळ तात्पुरती कारवाई न करता कायमस्वरूपी उपाययोजना करून गावाला या समस्येतून मुक्त करावे, अशी मागणी नागरिकांकडूनही होत

# मतदारांनो सावध ! फॉर्म न भरल्यास मतदानाचा हक्क धोक्यात : सणसरमध्ये तातडीचे अहवान

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत सणसर गावातील सर्व पात्र मतदारांनी तात्काळ आपल्या भागातील बी.एल.ओ. (BLO) यांच्याशी संपर्क साधून आवश्यक अर्ज भरून घ्यावेत, अन्यथा मतदार यादीतून नाव वगळले जाण्याची शक्यता असल्याचे महत्त्वाचे आवाहन महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाचे सदस्य ॲड.रणजित



निंबाळकर आणि सणसरचे सरपंच यशवंत पाटील यांनी केले आहे.मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी सुरू असलेल्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमात नव्याने नाव समाविष्ट करणे, चुकीची माहिती दुरुस्त करणे, पत्ता बदल, तसेच इतर आवश्यक बदलांसाठी संबंधित बी.एल.ओ. यांच्याकडे अर्ज भरणे आवश्यक आहे. अनेक नागरिक निष्काळजीपणामुळे हा महत्त्वाचा टप्पा दुर्लक्षित करतात. त्यामुळे भविष्यात मतदानाच्या दिवशी मतदार यादीत नाव नसल्याने मतदानाचा घटनात्मक हक्क गमावण्याची वेळ येऊ शकते.यामुळे सणसर ग्रामस्थांनी कोणताही विलंब न करता आपल्या भागातील बी.एल.ओ. यांच्याशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह फॉर्म भरून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे अत्यावश्यक असल्याचेही ॲड.रणजित निंबाळकर व सरपंच यशवंत पाटील यांनी स्पष्ट केले.

# मुसळधार पावसाचा तडाखा, जि. प.शाळा वांगण सुळे येथिल शाळेचे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : सुरगाणा तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या हाहाकाराने जिल्हा परिषद शाळा वांगण सुळे येथिल शाळेच्या इमारतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्याच्या तडाख्याने कौलारू छप्पर उडून गेले असून दोन आधारस्तंभ असलेले खांब कोसळले आहेत. त्याचबरोबर इमारतीच्या भिंतीला मोठा तडा गेल्याने इमारत अधिकच



धोकादायक बनली असून ती कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या घटनेने मात्र प्रशासन या धक्कादायक इमारतीकडे लक्ष देईल का? असा खडा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

संबंधित घटनास्थळी भेट देऊन प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शाळेची दुरुस्ती अथवा नविन इमारतीची तरतूद करावी अशी मागणी पालकांकडून केली जात आहे.

# अनेक पिडितांच्या समस्या सोडविण्याचे काम श्वास सामाजिक संस्था नेहमीच करते – अविनाश म्हापार्ले, अध्यक्ष

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी** : ' दान देणारा गर्विष्ठ होणार नाही आणि दान घेणारा लाचार होणार नाही. ' याचे भान प्रत्येक संस्थेने ठेवले पाहिजे. कारण " देणारा नेहमीच सर्वश्रेष्ठ असतो, मग तो आधाराचा शब्द असो किंवा अडचणीच्यावेळी दिलेला मदतीचा हात असो. " अशाच प्रकारे ' श्वास सामाजिक संस्थेने ' गरीब वं गरजू विध्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न केलेला आहे. समाजातील पीडित, गरजू वं गरीब जनतेला मदतीचा हात देऊन त्यांना मोकळा श्वास घेण्यास मदत केली आहे. आजपर्यंत अनेक पीडिताच्या समस्या सोडविण्याचे काम या श्वास सामाजिक संस्थेने केलेले आहे.

रविवार दिनांक 05 जुलै रोजी भिवंडी तालुक्यातील मोरणी या शाळेसह आजूबाजूच्या दुधनी - वापे, घाडणे, इजारीपाडा, करमाळे वं देवचोळे या अतिदुर्गम गावाच्या शाळेतील 200 गरजू वं गरीब विध्यार्थ्यांना दप्तर, छत्री, शाळेचा ड्रेस, वह्या वं पेन पेन्सिल देऊन यथोचित सन्मान




करण्यात आला. उपस्थित मोरणी गावचे राहिवाशी आणि विध्यार्थ्यांना जेवण दिले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नाना शिरसाट यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेऊन उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुछ देऊन स्वागत केले. संस्थेने वांगणी येथील तारांगण या मतिमंद मुलांसाठी विविध उपकारणे, चिपळूण येथील पूरग्रस्थाना आर्थिक, शैक्षणिक मदत, भाष्करबाबा वृद्धाश्रमात कपडे, जेवण व उपयुक्त वस्तूंचे वाटप, विक्रमगड येथील गरजू व होतकरू विध्यार्थ्यांना लॅपटॉप वं संगणकाचे वाटप आणि महारक्तदान शिबिराचे आयोजन असे विविध उपक्रम या संस्थेने केलेले आहेत. भविष्यातही श्वास सामाजिक संस्था ने अकेक उपक्रम हाती घेतलेले आहेत. " हातात हात घेला तर मैत्री होते, हातावर हात आपटला तर टाळी वाजते, कुणाला हात दिला तर मदत होते, हाताचे महत्व इतकेच आहे की जर अनेक हात पुढे आले अशक्य ते शक्य होते. " म्हणूनच श्वास सामाजिक संस्थेच्या असंख्य हातानी पुढे येऊन या अतिदुर्गम भागातील गरजू वं गरीब विध्यार्थ्यांना माफ्ट केली आहे.

या वेळी भिवंडी तालुक्याचे माजी सभापती - शांतारामदादा पाटील, सरपंच - श्याम गवाने, ठाणे पालघर कोयना प्रतिष्ठानचे - शशिकांत शिंदे वं विपुल पाटील, पोलीस पाटील - राजेश शिंदे, श्वास साजिक संस्थेचे अध्यक्ष - अविनाश म्हापार्ले, सचिव - जगदीश उबारे, खजिनदार - संदीप देसाई कार्यक्रमाचे आयोजक - प्रकाश कदम, किंगजॉर्जच्या शिक्षिका - मृणाल भारती, श्वास सामाजिक संस्थेचे सभासद, मोरणी गावातील राहिवाशी वं पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्वास च्या सर्व सभासदांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फार मोठी मेहनत घेतली.

# ₹५ लाखांच्या मदतीने तालमीला नवी उभारी

## खासदार संजय देशमुख यांच्या सहकार्याबद्दल युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांचे जाहीर आभार!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम तालमीतील पैलवानांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, युवकांमध्ये कुस्ती व व्यायामाची परंपरा अधिक बळकट व्हावी आणि तालमीचा सर्वांगीण विकास साधावा या उद्देशाने खासदार संजय देशमुख यांनी व्यायाम साहित्य खरेदीसाठी ₹५ लाखांची आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. या मदतीबद्दल युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांनी खासदार देशमुख यांचे मनःपूर्वक आभार मानत त्यांच्या सहकार्याचे कौतुक केले.

यावेळी आयोजित छोटेखानी कार्यक्रमात तालमीच्या विकासासाठी मिळालेल्या या आर्थिक सहाय्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. तालमीत सराव करणाऱ्या पैलवानांना आवश्यक असलेले आधुनिक व्यायाम साहित्य उपलब्ध झाल्यास त्यांना अधिक



'तालमी हा केवळ व्यायामाचा विषय नसून तो शिस्त, संस्कार आणि निरोगी पिढी घडविण्याचे केंद्र आहे. ग्रामीण भागातील पैलवानांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, या भावनेतून तालमीसाठी ₹५ लाखांची मदत देण्यात आली आहे. युवक आणि खेळाडूंच्या विकासासाठी यापुढेही माझे सहकार्य कायम राहील.'

— खासदार संजय देशमुख

'खासदार संजय देशमुख यांनी दिलेली ₹५ लाखांची आर्थिक मदत आमच्या तालमीसाठी अत्यंत मोलाची ठरणार आहे. त्यांच्या या सहकार्याबद्दल आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. या मदतीमुळे अनेक पैलवानांना आधुनिक सुविधा उपलब्ध होतील. भविष्यातही तालमीच्या विकासासाठी त्यांचे असेच सहकार्य कायम लाभावे, हीच अपेक्षा आहे.'

— युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखेडे

चांगल्या सुविधा मिळतील आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांनी सांगितले की, खासदार संजय देशमुख यांनी नेहमीच युवक, खेळाडू आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत सकारात्मक सहकार्य केले आहे. तालमीसाठी दिलेली ₹५ लाखांची मदत ही केवळ आर्थिक मदत नसून युवा खेळाडूंना प्रेरणा देणारी आहे. या सहकार्यामुळे तालमीच्या विकासाला निश्चितच गती मिळणार असून अनेक पैलवानांना त्याचा लाभ होईल.

यावेळी त्यांनी खासदार संजय देशमुख यांचे विशेष आभार व्यक्त करत, "यापुढेही तालमीच्या विकासासाठी आणि खेळाडूंच्या हितासाठी असेच मोलाचे सहकार्य कायम राहावे," अशी अपेक्षाही व्यक्त केली.

कार्यक्रमात उपस्थितांनी खासदार संजय देशमुख यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत त्यांच्या हस्ते मिळालेल्या मदतीमुळे तालमीच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी तालमीशी संबंधित पदाधिकारी, पैलवान, युवक तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.


# पावसाळी मासेमारी बंदीच्या कालावधीत वाढ, नियम मोडल्यास संस्थांची नोंदणी होणार रद्द

**ठाणे** : ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना आहे. समुद्रातील मत्स्यसाठ्याचे जतन करणे आणि पावसाळ्यात मच्छिमारांच्या जीविताचे व वित्ताचे रक्षण व्हावे, या उद्देशाने दरवर्षी लागू करण्यात येणाऱ्या पावसाळी मासेमारी बंदीच्या कालावधीत आता शासनाने महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. यापूर्वी १ जून ते ३१ जुलै या कालावधीत असणारी ही मासेमारी बंदी आता थेट १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे यंदा मच्छिमारांना एकूण ७६ दिवस समुद्रात मासेमारीसाठी जाण्यावर बंदी राहणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहायक आयुक्त (तांत्रिक), ठाणे-पालघर दिपाली बांदकर यांनी यासंदर्भातील सुधारीत कार्यालयीन आदेश जारी केले आहेत. शासनाने २९ जून २०२६ रोजीच्या नवीन आदेशान्वये जुन्या नियमात बदल केला असून, त्यानुसार यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांसाठी सुधारित पावसाळी मासेमारी बंदीचा हा नवीन कालावधी लागू करण्यात आला आहे. या नव्या निर्णयामुळे १ जून २०२६ ते १५ ऑगस्ट २०२६ या सुधारित कालावधीची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.

भविष्यातील मत्स्यसाठ्याचे जतन करण्यासाठी आणि पारंपरिक मच्छिमारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी अनधिकृत मासेमारीला आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे. या आदेशाचे उल्लंघन करून जर कोणतीही नौका समुद्रात बेकायदेशीरपणे मासेमारी करताना आढळली, तर तिच्यावर सागरी कायद्यांतर्गत कडक कारवाई केली जाईल. इतकेच नव्हे तर, जी कोणतीही मच्छिमार सहकारी संस्था अशा अनधिकृत मासेमारीला प्रोत्साहन देईल किंवा प्रशासनाला सहकार्य करणार नाही, त्या संस्थेची नोंदणी थेट रद्द करण्याचा प्रस्ताव उपनिबंधक (मत्स्य) यांच्याकडे पाठवला जाईल, असा सक्त इशारा सहायक आयुक्तांनी दिला आहे.

या सुधारित बंदी कालावधीबाबत ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील सर्व मच्छिमार सहकारी संस्था, त्यांचे चेअरमन आणि मच्छिमारांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्व मासळी उतरवण्याच्या केंद्रांवर आणि संस्थांमध्ये पोस्टर्स, बॅनर्स, सोशल मीडिया आणि कार्यशाळांच्या माध्यमातून या नव्या नियमांची माहिती दिली जाईल, जेणेकरून कोणत्याही मच्छिमाराचे नुकसान होणार नाही आणि नियमांचे योग्य पालन होईल.



# पंढरीची वारी: एक अविस्मरणीय आध्यात्मिक भक्तीप्रवास





महाराष्ट्र ही संतांची आणि अखंड भक्तीने पावन झालेली भूमी आहे. या भूमीच्या परंपरेचा आणि अध्यात्माचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे पंढरपूरची आषाढी वारी. दरवर्षी ज्येष्ठ आणि आषाढ महिन्यात अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय वातावरणामध्ये दंग होऊन जातो. मानवी भावना, शिस्त, भक्ती आणि निसर्गाचे मोहून टाकणारे रुप वारीमध्ये अनुभवायला मिळते.

देशभरातील सर्वात मोठा आणि शिस्तबद्ध मानवी उत्सव म्हणून पंढरपूर वारीकडे पाहिले जाते. दरवर्षी आषाढी वारीच्यानिमित्ताने लाखो वारकरी विठुरायाचे नामस्मरण करत शेकडो किलोमीटरची पायपीट करतात. केवळ विठुरायाच्या भेटीसाठी वय, जात, धर्म, भाषा, हे सर्व भेद विसरून लाखो लोक एकाच ध्येयाने प्रवास करत असतात. पायी चालत चालत पंढरपूरच्या दिशेने निघालेला वारकरी विठ्ठलभक्ती, समता, सेवा आणि मानवतेचा संदेश देत असतो.

एका पर्यटकाच्या दृष्टीने तर वारी अनुभवणे म्हणजे सुखाचा सोहळा आहे. परदेशातून तसेच देशविदेशातून येणाऱ्या पर्यटकांना आषाढी वारीमध्ये महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे अभूतपूर्व दर्शन घडते. 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमून जाणारा परिसर पर्यटकांना भक्तीमय वातावरणामध्ये घेऊन जातो.

वारीची खरी सुरुवात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा (आळंदी) आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळा (देहू) यांच्या प्रस्थानाने होते. हजारो वारकरी, हातात टाळ-मृदंग, खांद्यावर भगवी पताका आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा गजर करतात. अशावेळी संपूर्ण परिसरामध्ये सकारात्मक उर्जा जाणवते. रंगीबेरंगी पोशाख, कपाळी चंदनाचा टिळा लावलेल्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान अनुभवताना मन हरवून जाते. वारी अनुभवण्यासाठी तसेच प्रत्येक क्षण कॅमेऱ्यामध्ये टिपण्यासाठी मोठ्या संख्येने छायाचित्रकार, पर्यटक गर्दी करतात.

वारीदरम्यान होणारे रिंगण सर्वात मोठे आकर्षण असते. वारकऱ्यांनी तयार केलेले एक मोठे वर्तुळ म्हणजे रिंगण. सर्व वारकरी, टाळकरी, झेंडेकरी, मृदुंग वादक, वीणेकरी गोलाकार उभे राहतात. त्यानंतर नामगजरास सुरुवात होते. टाळ-मृदुंगाच्या एकाच तालात वारकरी ठेका धरतात. या तालातच भरधाव वेगाने दिंडी सोहळ्यातील अश्व गोलाकार प्रदक्षिणा करीत पालखीला अभिवादन करतो. टाळ-मृदुंगाचा वेग, जयजयकार आणि वाऱ्याच्या वेगाने धावणारा अश्व हे सारे दृश्य प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी लाखोंची गर्दी जमा होते. अश्व धावून गेल्यानंतर त्याच्या टापांखालील माती कपाळाला लावण्यासाठी भाविक आतुर होतात. याशिवाय 'उभे रिंगण' आणि 'आडवे रिंगण' तयार करुन यामध्ये वारकरी फुगड्या खेळतात, धावण्याच्या स्पर्धा आयोजित करतात आणि वेगवेगळ्या पारंपरिक लोककला सादर करतात.

जुन्या मुंबई-पुणे मार्गावरून आणि सासवडच्या दिवे घाटातून वारीचा प्रवास सुरु असतो. विठ्ठल नामाचा गजर करत लाखो वारकरी दिवे घाटातून मार्गस्थ होत असतानाचे दृश्य स्वर्ग सुखाचा अनुभव देते. पावसाच्या हलक्या सरी, सर्वत्र पसरलेली हिरवळ, डोंगर-रागांमधून वाहणारे छोटे-मोठे धबधबे आणि त्यामधून वाट काढत जाणारे वारकरी हे सारे क्षण डोळ्यांमध्ये साठवून ठेवण्यासारखे असतात. एखाद्या ड्रोन कॅमेऱ्याच्या नजरेमधून दिवे घाटाचा परिसर पाहताना भक्ती आणि निसर्गाचा अनोखा संगम अनुभवायला मिळतो.

विठ्ठल नामाच्या गजरात स्वतःला विसरून जाणारे वारकरी, भारतीय अध्यात्म, लोकसंस्कृती आणि संत परंपरा जवळून अनुभवण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक, अभ्यासकही वारीमध्ये सहभागी होतात. एकता, सेवाभाव, श्रद्धा, अध्यात्म हाच जीवनातील खरा आनंद आहे हे वारी आपल्याला आपसुकच शिकवते. पांडुरंगाच्या ओढीने सुरु झालेला हा प्रवास प्रत्येकाला आत्मचिंतन करण्याची संधी देतो आणि यामधूनच आध्यात्माची गोडी निर्माण होते.

पंढरपूर वारीच्या निमित्ताने पर्यटकांना महाराष्ट्राच्या वैविध्यपूर्ण आध्यात्मिक वैभवाचा प्रवास अनुभवता येतो. विठुरायच्या भेटीबरोबरच अनेक महत्त्वाची आध्यात्मिक स्थळे पाहता येतात. देहू आणि आळंदी ही संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांची पुण्यभूमी वारकरी परंपरेचा समृद्ध वारसा अनुभवण्याची संधी देतात. त्यानंतर अष्टविनायकाचे मुख्य पीठ असलेल्या मोरगावच्या मयूरेश्वराचे दर्शन घेऊन हा प्रवास पुढे सुरु राहतो. 'येळकोट येळकोट जय मल्हार' म्हणत जेजुरी गडावर नतमस्तक होऊन पुढचा प्रवास करता येतो. सोलापूर जिल्ह्यातील तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर, गाणगापूर येथील दत्तसंप्रदायाचे पवित्र क्षेत्र ही जागृत देवस्थाने आध्यात्मिक भव्यता द्विगुणित करतात. अखेरीस पंढरी नगरी गाठल्यानंतर विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे रुप डोळ भरुन पाहण्याबरोबरच संत नामदेव पायरी, पुंडलिक मंदिर, चंद्रभागा नदी घाट, गोपाळपूर यांना भेट देता येते. पंढरपूर वारीकडे फक्त धार्मिक यात्रा म्हणून न पाहता यामधून महाराष्ट्राच्या समृद्ध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाचे अविस्मरणीय दर्शन घडते.

आमच्या बद्दल:

महाराष्ट्र पर्यटन विभागची ३१ मे २०१६ रोजी स्थापना झाली. राज्याचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि पर्यटन क्षेत्र अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने या विभागाची स्थापना करण्यात आली. पर्यटन आणि संस्कृती यांची नाळ एकमेकांशी घट्ट जोडलेली आहे. कारण ऐतिहासिक स्मारके, लोककला आणि स्थानिक परंपरा या केवळ सांस्कृतिक ठेवा नसून पर्यटन आकर्षण म्हणूनही ओळखल्या जातात. हेच लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ स्तरावरील विभाग स्थापन केला.

सदर विभाग महाराष्ट्रातील अद्वितीय कला प्रकार, परंपरा आणि ऐतिहासिक स्थळे जपण्यासाठी, त्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी कार्य करतो.

तसेच, सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवून, पर्यटन विकासाला चालना देऊन हा विभाग राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देत आहे. सदर विभागाच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्र राज्य केवळ एक पर्यटन स्थळ म्हणूनच नव्हे, तर एक जिवंत संस्कृती आणि वारसा असलेले राज्य म्हणून अधिक समृद्ध आणि आकर्षक बनत आहे.

**किरण जाधव**

# पर्जन्यवनात फेरफटका





ऑस्ट्रेलियातील केन्सजवळील कुरांडा पर्जन्यवन हा केवळ निसर्गाचा नव्हे, तर हजारो वर्षांच्या आदिवासी संस्कृतीचाही अद्भुत वारसा आहे. हिरव्यागार जंगलातून रेल्वे, स्कायरेल आणि पदभ्रमंती करत अनुभवलेली ही सफर निसर्ग, इतिहास आणि लोकपरंपरेचा अविस्मरणीय संगम घडवते.

खंडाळा, लोणावळ्याच्या असंख्य वर्षासहलींमध्ये मखमली हिरवळ पांघरलेले डोंगर अगदी डोळे भरून पाहिले आहेत; पण सतत पर्जन्यवृष्टी होत राहणारी दाट जंगलं मी प्रथम पाहिली ऑस्ट्रेलियात. या निसर्गसंपन्न देशातील 'ग्रेट बॅरियर रीफ'च्या सागरसंपत्ती इतकीच ही डोंगरमाथ्यावरील हिरवाई मला वेड लावून गेली. केन्स शहारामधूनच या जंगलसफरी निघतात. पर्यटकांना या जंगलांचा आस्वाद घेता यावा म्हणून शंभरएक वर्षांपूर्वी इथे रेल्वे खोदण्यात आली. 'कुरांडा सिनिक रेल्वे' अशा नावाचा बिल्ला छातीवर मिरवत ही झुकझुक गाडी मोठ्या दिमाखानं केन्स ते कुरांडा हा डोंगरमाथ्यापर्यंतचा प्रवास करते. कुरांडा हे त्या डोंगरमाथ्यावर वसलेलं एक छोटंसं टुमदार गाव ! समुद्रसपाटीपासून तीनशे मीटर उंचीवर असलेल्या या थंड हवेच्या ठिकाणी नेणारा साडेसात किलोमीटरचा हा प्रवास नयनमनोहर दृश्यांनी परिपूर्ण आहे.

गर्द राईतून झुकझुक करत जाताना, पानांवरून टपटप गळणाऱ्या पावसाच्या थेंबांकडे मान वर करून पाहताना आकाशात विहार करणाऱ्या पक्ष्यांचा मला नेहमीच हेवा वाटत आलाय. असं वाटतं, त्यांच्या डोळ्यांतून ही हिरवीकंच जंगलं पाहता आली तर? इथे त्याचीही सोय आहे. स्कायरेल ! कुरांडा रेल्वे, स्कायरेल आणि आपली दोन पायांची रपेट या तिन्ही पर्यायांमुळे जंगलातील फेरफटक्याची छान सोय होणार होती. केबलकारमध्ये बसून त्या महाकाय वृक्षांच्या शेंड्यांनी बनलेलं हिरवं छत पाहायला मिळणार, झुकझुक गाडीतून जाताना ओसंडून वाहणारे धबधबे डोळ्याचं पारणं फेडणार आणि झाडांमधून जाणाऱ्या लाकडी वाटांवरून चालताना हिरवा रानगंध नाकात ओढून घेत त्या वृक्षवल्लींना स्पर्श करता येणार, त्यांची इत्यंभूत माहिती वाचता येणार, त्यांची नावं वाचून त्यांना साद घालत त्यांच्याशी संवाद साधायला मिळणार, गंतव्यस्थानी पोहोचण्याआधी कल्पनेनंच मी हुरळून गेले.

आम्ही सुरुवात केली स्कायरेलने. डोंगराळ प्रदेश, गर्द वनराई आणि अगदी धीम्या गतीनं वर चढणारी केबलकार ! खोल अरुंद दऱ्या, मध्येच खळाळत जाणारा झरा.. खाली पसरलेल्या पाचूच्या बनात काही वृक्ष ओळखीचे, तर काही अगदीच अनोळखी. घरातील कुंडीत कसाबसा सामावलेला फर्न इथे उदंड फोफावला होता. मात्र इथे त्याचे बरेच चुलते दिसले. कुठे परडीसारखा, कुठे घरट्यासारखा तर कुठे ढोलीसारखा ! एके ठिकाणी तर तो वृक्षाच्या डोक्यावर मुकुटासारखा उगवलेला दिसला. हिरव्या रंगाच्या कितीतरी विविध छटा दिसत होत्या. कोवळ्या पालवीचा पोपटी आणि प्रौढत्वाला झुकलेला काळसर दाट हिरवा. पिकलं पान मात्र औषधालाही दिसलं नाही. पावसाच्या सतत शिडकाव्यामुळे सगळं जंगल हिरवंगार! काही वृक्ष इतके उंच की वरून जाणाऱ्या गोंडोलातून वाकून एखादं अनाघ्रात पान तोडता येईल. झाडांच्या मुळाशी तर नजर पोहोचतच नव्हती. उन्हं अंगावर घेण्यासाठी झाडांची जणू चढाओढ लागली होती. जागा मिळेल तिथे वाकडं-तिकडं होत शिरकाव करणं हाच येथील जीवन मंत्र असावा.

रेड पीक हे केबलकारचं पहिलं स्टेशन. तिथे जवळजवळ चारशे वर्ष जुना पाईन वृक्ष पाहिला. राक्षसाच्या 'पाम' एवढी मोठी पाम वृक्षाची पानं पाहिली. आपल्याला परिचित पामही होता तिथे, मात्र त्याचे बुंधे लाल होते. एखाद्या उत्तर भारतीय स्त्रीनं भांगात लांबवर सिंदूर भरावा असे. भल्यामोठ्या वृक्षांना बिलगून उभ्या नाजूक वेली भेटल्या. विशिष्ट वृक्षांसमोर त्याचं नाव, गाव, वय, पर्यावरणातील त्याची भूमिका, स्थानिक, सामाजिक, सांस्कृतिक लोकजीवनातील त्यांचं महत्त्व इत्यादी बरीच माहिती होती. उंच झाडांच्या फांद्यांवरून ठिबकणारं पाणी छोट्या झाडांच्या माथ्यावर पडत होतं. त्यातून एक लयबद्ध संगीत स्रवत होतं. मध्येच एक मोठा वृक्ष धारातीर्थी पडलेला दिसला. वरून येणाऱ्या प्रकाशाची तिरीप आता खालच्या स्तरापर्यंत पोहोचत होती. कदाचित या 'आशेच्या किरणा' द्वारे एक नवा अंकुर फुटेल. अंधारात जीवन कंठणाऱ्या या वंशजांमध्ये 'ज्योतिर्गमय' म्हणत, सूर्यप्रकाश पिणारा स्वतंत्र वर्गातील एक निराळा वनस्पती जीव जन्माला येईल. म्हणूनच म्हणतात, ही पर्जन्यवनं प्राचीन असली तरी अशा प्रकारे नित्यनूतनच आहेत.

बॅरन फॉल्स या दुसऱ्या स्टेशनवर उतरल्यावर ८५३ फुटांवरून स्वतःला झोकून देणारा जलप्रपात पाहून आम्ही अगदी मुग्ध झालो. त्याचा आनंद घेऊन आम्ही कुरांडा या अंतिम स्टेशनवर उतरलो. या छोट्याशा निसर्गरम्य गावावर दुकानं आणि आहारगृहांनी केलेला कब्जा पाहून सुरुवातीला तर मन खट्टूच झालं. चायनीज पदार्थांचा धुरकट उग्र वास आसमंतात भरून राहिला होता. अर्थात संपूर्ण दिवस घालवण्यासाठी कुरांडामध्ये भरपूर आकर्षणं आहेत. छानशी फुलपाखरांची बाग आहे, पक्ष्यांचा शिकारखाना आहे, कोआला पार्क आहे. धाडसी पर्यटकांसाठी जीप, बाइक, बग्गी चालवत जंगलाच्या आतून नेणारा प्रवास आहे, घोडेस्वारी आहे. बॅरन नदीतील नौकाविहारसुद्धा आहे.

शंभर दशलक्ष वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या या पर्जन्यवनात १२०० प्रकारची फुलझाडं आहेत, नाजूक वेली आहेत, तसेच आवळून गिळून टाकणारे महाकाय 'फिग्स' आहेत. (पर्यटकांना ती भीती नाही) फिग्सची ही जात त्याच्या शेजारील झाडाभोवती आपल्या फांद्या पसरवून शेवटी त्याला आवळून 'खल्लास' करून टाकते. टेबललँडच्या टूरमध्ये असाच एक प्राचीन 'कर्टन फीग ट्री' आम्ही पाहिला होता. त्याच्या पारंब्या वाढून एक मोठा पडदा तयार झाला आहे. दहा हजार चौरस मीटरचं हे पर्जन्यवन हवामान, पर्जन्यवृष्टी, आर्द्रता, जमिनीचा कस, उंच-सखलपणा, ऊन-सावलीचा खेळ यामुळे खूप फोफावलं आहे. ही जंगलं ताजी, शुद्ध हवा पुरवतात आणि वर्षाला सरासरी ४००० मिमी पाऊस पडल्यामुळे इथे पाण्याचा मुबलक साठा आहे. दाटीवाटीनं उभ्या असलेल्या झाडांची मुळं जमिनीत खोलवर रुजून जमिनीची झीज थांबवतात. उष्ण कटिबंधातील या जंगलामध्ये खूप औषधी वनस्पती उगवतात. मांसल गराची फळं आणि उत्तम प्रकारचं लाकूड हे या जंगलसंपत्तीचं वैशिष्ट्य ! मला इथल्या मूळच्या आदिवासींच्या संस्कृतीत स्वारस्य होतं. इथे त्यांना अबोर्जिनल्स म्हणतात. त्यांची संस्कृती आणि कलाकौशल्य जतन करण्याचा वसा इथल्या सरकारनं घेतलाय. बुमरँग हे त्यांचं पसरट व्ही आकाराचं लाकडी शस्त्र बघण्याची मला खूप उत्सुकता होती. ते विशिष्ट प्रकारे फेकलं असता पक्ष्याचा वेध घेऊन फेकणाऱ्याकडे परत येतं. परंतु हे ऐऱ्यागैऱ्याचं काम नोहे !

ते एक वेगळंच कौशल्य आहे. त्या बुमरँगवर बारीक ठिपक्यांची चित्रं काढलेली होती. त्यात साप, पाली, सरडे, चिमण्या आणि काही अगम्य चिन्हे रेखाटलेली दिसली. हे ठिपके म्हणजे केवळ रंग किंवा चित्रकला नव्हे; तर हजारो वर्षांचा इतिहास पाश्चात्यांच्या नजरेपासून लपवून ठेवणारी ती एक गुप्त भाषा होती. आपल्या पूर्वजांचे ज्ञान, पाण्याचे गुप्त साठे आणि धार्मिक विधींची माहिती युरोपियनांना समजू नये म्हणून त्यांनी ही ठिपक्यांची भाषा वापरायला सुरुवात केली. यातील वेगवेगळे रंग वाळू, पाणी, डोंगर किंवा पवित्र जागा यांचे आकाशातून दिसणारे नकाशे असतात. वरून पाहताना ती नक्षी वाटते, पण त्या ठिपक्यांच्या आत त्यांचा इतिहास लपलेला असतो. या प्रदर्शनात पोकळ बांबू किंवा लाकडापासून केलेलं 'डीजरीडू' हे वाद्य बघितलं. दुरून वाटलं, वाजवायला सोपं असावं. मात्र बेंबीच्या देठापासून त्यात हवा फुंकली तरी ते वाजेना. त्या आदिवासींनी त्यात प्राण फुंकल्यावर मात्र त्यातून खोल, धीरगंभीर नाद उमटू लागला आणि सारे वातावरण मंतरल्यासारखे झाले. अंगावर पांढऱ्या पिवळ्या मातीचे ठिपके लावून या आदिवासींनी काठ्या, भाले घेऊन सादर केलेलं पारंपरिक नृत्य मला थेट आपल्या आदिवासी पाड्यांमध्ये घेऊन गेलं. फार पूर्वी देशांच्या सीमा नव्हत्या तेव्हा एकच संस्कृती असावी नाही? उदरभरण, प्रजनन आणि स्वसंरक्षण या तीन गोष्टी साधल्या की उरलेला वेळ माणसं असा नाचगाण्यात घालवत असावीत.

आमचा परतीचा प्रवास होता कुरांडा सिनिक रेल्वेमधून. आपल्या दख्खन राणीसारखी ती बोगद्यातून वाट काढत धावत होती. डोंगरांशी लपाछपी खेळत, पावसाची रिमझिम अंगावर झेलत, ओसंडून वाहणारे धबधबे न्याहाळत आणि पळती झाडे पाहत हा प्रवास चालू होता. पंधरा बोगदे आणि ९३ वळणं घेत गाडी तळाशी पोहोचली. या गाडीच्या इंजिनावर एका भल्यामोठ्या सापाची आकृती रंगवलेली दिसली. त्यामागे एक मोठी मजेशीर दंतकथा आहे. बुदादजी हा या आदिवासींचा देव. सृष्टीचा निर्माता ! तो नागमोडी वळणं घेत, समुद्रतटापासून गिरिशिखरापर्यंत सरपटत जायचा. बॅरन नदी, समुद्राला जोडणारी त्याची खाडी आणि बॅरनची खिंड कोरून काढणारा म्हणे हाच तो शिल्पकार ! त्याच्या पाठीवर आतून मोतिया रंगाची चकाकी असलेलं शिंपल्यांचं सुंदरसं कवच होतं. बॅरन खिंडीतून वर चढताना बुदादजी आपले हे प्रभुदत्त शिंपले विकून त्याबदल्यात जीवनोपयोगी वस्तू घेत असे. असा हा 'बाजारा'ला जायचा प्रवास बरीच वर्ष चालू होता. एके दिवशी तीन पारध्यांची नजर बुदादजींच्या पाठीवरील त्या अलौकिक चमकदार खजिन्यावर पडली. त्या शिंपल्याच्या हव्यासापोटी त्यांनी बुदादजीला मारून, त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करून ते इतस्ततः विखरून टाकले.

शरीर शांत झालं तरी त्याचा अमर आत्मा या जंगलात विश्रांती घेतोय आणि त्याचं रक्षणही करतो आहे अशी इथल्या स्थानिकांची श्रद्धा आहे. कुरांडाच्या जंगलानं आणि तिथल्या माणसांनी त्याला आपल्या हृदयात जिवंत ठेवलंय.

अमर आत्म्याच्या इच्छाशक्तीत अतुलनीय बळ असतं म्हणतात. त्याच्यापाशी केवळ एकच प्रार्थना- हे बुदादजी, येथील मानवाला तुझं हे पाचूचं बन अबाधित ठेवण्याची बुद्धी दे!

**मेधा आलकरी**
**लेखिका आणि ट्रॅव्हलर**